नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. भाऊजी दफ्तरी स्मृति संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या — कै. डॉ. भाऊजी दफ्तरी

प्राचीन विदर्भाचें काव्य — नारायण नागोराव हूड

याशिवाय संघवार्ता, पुस्तक परामर्श,
साभार स्वीकार वगैरे

विदर्भ साहित्य संघ, नागपूर दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष ११ — संपादक : — जुलै १९५६

अंक ४ — पां. कृ. सावळापूरकर — किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक

पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :

कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें   अंक ४ था

जुलै १९५६

संपादकीय

कै. वीर वामनराव जोशी

महाराष्ट्राचे एक ख्यातनाम नाटककार व साहित्यिक, प्रभावी वक्ते, विदर्भाचे नेते, राजकारणपटु, निष्ठावन्त कार्यकर्ते आणि निःस्पृह मार्गदर्शक असे वीर वामनराव जोशी यांचें दि. ३ जून १९५६ रोजीं अमरावती येथे निधन झालें त्यामुळे महाराष्ट्रीय राजकारण व मराठी साहित्य या दोन्हीची अतिशय हानी झाली आहे. कै. वामनरावदादा यांना जनतेने 'वीर' ही जी पदवी दिली होती ती अनेक दृष्टींनी यथार्थ होती. वीरत्व हें त्यांच्या संपूर्ण आयुष्याचें मूलभूत तत्त्व होतें. आयुष्याच्या शेवटीं शेवटीं वृद्धापकाळांत देशभक्तीचा गौरव म्हणून त्यांना जी देणगी सरकारने पाठविली होती, ती जशीच्या तशी परत करण्यांत त्यांनी या वीरत्वाची परिसीमा गाठली होती. कारण द्रव्यलोभावर जय मिळविणें हें फार मोठें वीरलक्षण आहे. कै. वामनरावदादांचा विदर्भ साहित्य संघावर फार मोठा लोभ होता व त्यांनी एकदा संघाच्या लोहकुटीस भेटहि दिली होती. नव्या महाराष्ट्राच्या निर्माणसमयीं त्यांच्यासारख्या मुरब्बी कार्यकर्त्यांची अतिशय आवश्यकता होती. पण परमेश्वरी इच्छा कांही वेगळीच होती.

वेदान्त त्यांच्या रूपाने जणु साकार झाला होता इतकें त्यांचें आचरण अन्तर्बाह्य निष्ठेचें होतें. राजकारण आणि वेदान्त हे एकच आहेत हें त्यांनी सिद्ध केलें होतें

आगस्टचा युगवाणीचा अंक 'टिळक आगरकर जन्मशताब्दि उत्सव विशेषांक' काढण्याचा आमचा मनोदय आहे, त्या अंकांत वीर वामनरावदादांचा एक लेख अवश्य असावा अशी आम्ही उमेद बाळगली होती. पण आमची ही विनंती त्यांच्या कानीं जाण्यापूर्वीच त्यांचा वियोग घडून आला याचें फार दुःख होत आहे.

वीर वामनरावदादांच्या मृत्यूने सर्व महाराष्ट्रास व विशेषतः त्यांच्या कुटुंबीयांस फार दुःख झालें आहे. त्या दुःखांत विदर्भ साहित्य संघ व त्या संघाचें मुखपत्र 'युगवाणी' हे सहभागी आहेत. विदर्भ साहित्य संघाने एक सभा भरवून आपली श्रद्धांजलि वीर वामनरावदादांना अर्पण केली होतीच.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या लेखाच्या रूपाने 'युगवाणी' हि आपली श्रद्धांजलि अर्पण करीत आहे.

वेदान्ती योग्याला धर्मशास्त्राप्रमाणे जी परमगति प्राप्त व्हावयाची ती वामनराव दादांच्यां चैतन्याला प्राप्त झाली असेलच अशी आमची श्रद्धा आहे.

टिळक आगरकर अंक

१ आगस्ट १९५६ चा अंक टिळक-आगरकर विशेषांक राहील. त्या संबंधी आमच्या अपेक्षेप्रमाणे कोठूनहि सहकार्य मिळालें नाही. तरीहि आम्ही आपला निश्चय पार पाडण्याची उमेद बाळगतों.

पुस्तक-परामर्श

हें सदर गेलीं १-२ वर्षें बंदच होतें. अभिप्रायार्थ येऊन पडलेल्या ग्रंथांपैकी जितके संग्रहीं दिसले त्यांची पोच मागे दिली होतीच. त्यांपैकी कित्येकांचा परामर्श या अंकांत घेतलेला दिसेल. इतरांचा परामर्श यापुढील अंकांत घेऊं. नियमित पृष्ठसंख्येमुळे, पूर्वी विविधज्ञानविस्तारांत येत अशीं, विस्तृत परीक्षणें देणें आम्हाला शक्य होणार नाही. तरीहि कोणत्याहि पुस्तकास अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यांत येईल. आमच्या विनंतीप्रमाणे ज्या अभिप्राय लेखकांनी मुद्दाम पुस्तकें वाचून अभिप्राय लिहून दिले त्यांची 'युगवाणी' ऋणी आहे.

लेखकांस प्रार्थना

या सदराखाली जी विनंती याच अंकांत अन्यत्र केली आहे ती लक्षपूर्वक वाचावी अशी विनंती आहे. आम्हांला अभ्यासपूर्ण भरीव लेखांची गरज आहे, पण आमच्यावर मारा होत आहे तो फक्त चिमुकल्या कवितांचा. या आपत्तींतून आमची सुटका करणें हें अभ्यासकांच्या हातीं आहे.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
२. नाटककार गडकरी	--श्री द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	-कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडकोपनिषद्

कै. डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दफ्तरी

टिप्पणें—द्वा सुपर्णा इत्यादि = हीं आकारांत पदें येथे द्विवचनांत आहेत. वेदांमध्ये पुष्कळ ठिकाणीं कोणत्याहि विभक्तिप्रत्ययाऐवजी "डा" म्हणजे आ लागतो व त्याने शब्दाचा शेवटचा स्वर व त्यापुढील व्यंजन गळतें. परिषस्वजाते = हें लिटाचें रूप आहे. धातु स्वज् अभिचाकशीति = हें कश् "गतिशासनयोः" ह्या धातूचें क्यङ् प्रत्ययांत रूप आहे पण त्याचा अर्थ काय ह्याचा संशय आहे. भागवतकारांनी "वलेन भूयान्" असा त्याचा अर्थ केला आहे. (भा. ११।११।६–७) त्याला अनुसरूनच मी त्या शब्दाचा अर्थ येथे केला आहे. हा शब्द बृहदारण्यक ४।३।११ व श्वेताश्वरोपनिषद् ३।५। येथेहि आला आहे. ह्या दोनहि ठिकाणीं "सामर्थ्य देणें" असा अर्थ जुळतो. सामर्थ्य देणारा स्वतः समर्थ असलाच पाहिजे म्हणून सामर्थ्यसंपन्न असणें असा अर्थ करता येतो. "कश्" धातूचा "शासन" हा जो अर्थ आहे त्यांत वलाचा अंतर्भाव होतोच. अनीशया—अनीशा म्हणजे दुर्बलता. ऐतरेय १।२ मध्ये "नतस्येशे" येथे "ईशे" ह्याचा अर्थ ह्या सारखाच करावा लागतो.

जुष्टं—हा कर्तरि क्त मानावा लागतो. म्हण जेजुष्ट ह्याचा अर्थ "झाडाचें सेवन करणारा म्हणजे झाडावर बसलेला" असा करावा लागतो.

"इति" हें "इ" म्हणजे जाणें ह्या धातूचें आर्षरूप आम्ही मानलें आहे. व्याकरणशुद्ध रूप, "अयति" किंवा "एति" असें होतें. असें मानल्याने अन्वय करण्यांत अडचण राहात नाही. श्री. शंकराचार्यांनी "अनेकैः योगमार्गैः कर्मिभिश्च जुष्टं सेवितम् अन्यं ईशं अस्य महिमानंच यदा पश्यति तदा वीतशोकः भवति" असा अन्वय केला आहे. ह्यांत "च" हा जास्त घालावा लागतो आणि "इति" हा शब्द निरर्थक पडून राहतो. त्यापेक्षा "इति" म्हणजे "अयति" "एति" असें मानून अन्वय करणें बरें वाटतें. शिवाय पुढील श्लोकांत "साम्यमुपैति" ह्यांत जें सांगितलें तेंच ह्या श्लोकांत "महिमानमिति" ह्यांतूनहि निघतें, हें चांगलेंच आहे. कदाचित् पाठभ्रंशानेहि "अयति"चें "इति" झालें असेल.

"पश्यः" पाहण्याची शक्ति ज्याला आहे तो. पश्यः म्हणजेच जीव. कारण जीवच पाहूं शकतो. ईश्वर कोणाहि पाहूं शकत नाहीं व पाहातहि नाही.

द्वितीय मुंडकाच्या पहिल्या खंडांत अनाविष्कृत ब्रह्माचें वर्णन करून त्यापासून जग उत्पन्न झालें हें वर्णन केलें. त्या मुंडकाच्या दुसऱ्या खंडांत आविष्कृत ब्रह्माचें म्हणजे जीवाचें वर्णन करून, त्याचीच उपासना करावी हें आणि ती कशी करावी तें सांगितलें. तृतीय मुंडकाच्या पहिल्या खंडांत त्या उपासनेचें फळ मुख्यतः सांगितलें आहे आणि तेंहि ह्या तीन श्लोकांत विशेषतः "परमं साम्यमुपैति" ह्या वाक्यांत सांगितलें आहे. ह्या वाक्यांत ब्रह्मज्ञानाचें फळ फार समर्पक शब्दांनी अगदी यथार्थ सांगितलें आहे. ब्रह्मज्ञ ब्रह्मच होतो असें जरी इतर ठिकाणीं, विशेषतः मुंडक ३।२।९, कठ ४–४।५ आणि बृहदारण्यक ४, ४, २५ येथें सांगितलें असलें तरी तें एक प्रकारचें काव्य आहे. त्याचाहि खरा अर्थ हाच आहे की ब्रह्मज्ञ जीव व ब्रह्म ह्यांमध्ये, अतिशय साम्य असतें. तें साम्य कसें तें आतां दाखवितों.

(१) ब्रह्माला, तें झोपेसारख्या अद्वैत स्थितींत असल्यामुळे दुसरी वस्तूच दिसत नाही. ब्रह्मज्ञ जीवाला दुसरी वस्तू दिसत असूनहि ती स्वतःहून भिन्न नाही असें तो मानतो. विशेषतः दुसरे जीव स्वताहून भिन्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाहीत असें तो मानतो. म्हणजे त्याला अद्वैताचा प्रत्यय असतो. हें परमसाम्य होय, एकरूपत्व नव्हे.

(२) ब्रह्माला वासना उत्पन्न होऊंच शकत नाहीत, कारण ज्यांची वासना करावी त्या वस्तूच त्याला दिसत नसतात; ब्रह्मज्ञजीवाला दुसऱ्या वस्तू दिसत असूनहि त्याविषयीं तो वासना करीत नाही, कारण वासनापूर्तिजनित सुख क्षणभंगुर व दुःखजनकहि असतें असें त्याला पटलेलें असतें. (३) ब्रह्म वासना नसूनहि कर्म करतें. ब्रह्मज्ञजीवहि वासना टाकून देऊनहि कर्म करीत असतो. पण त्याला कर्म केल्याची जाणीव असते व कर्माची प्रेरणा तरी करावी लागते. हें परमसाम्य आहे एकरूपत्व नव्हे. (४) ब्रह्माचें म्हणजे ईश्वराचें ईश्वरत्व सर्वांवर आहेच. त्यामुळे त्याचे सर्व संकल्प पूर्ण होतात असें म्हणतां येतें. छांदोग्य ८।२ येथे व त्यावरील आमच्या विवरणांत दाखविल्याप्रमाणे ब्रह्मज्ञाचे सर्व संकल्प इतर जीवांकडून पूर्ण होतात. म्हणजे त्याचेंहि त्या इतर जीवांवर ईश्वरत्व असतेंच. हें परमसाम्य आहे, (कारण संकल्प पूर्ण होणें व ईश्वरत्व हें दोनहि ठिकाणीं आहेच) एकरूपत्व नव्हे. (व्याससूत्रें ४।४।८-९ ह्यावरील आमचें विवरण व त्यापुढील टिपण पहा.) (५) ब्रह्म आनंदरूप आहे पण त्याला त्या आनंदाचें भान नाही. कठवल्ली ५।१४ प्रमाणे त्याला आनंदाचें भान आहे किंवा नाही तें सांगतां येत नाही. ब्रह्मज्ञ जीव आनंदाची भावना करून आनंदाचा अनुभव घेतो व त्याचें त्याला भान असतें. (हें आनंदाचें भान होण्याकरिताच ब्रह्म जीव बनलें आणि हें आनंदाचें भान ब्रह्मज्ञ जीवालाच होतें.) हें परमसाम्य होय एकरूपत्व नव्हे. ह्याप्रमाणे ब्रह्मज्ञजीवाला ब्रह्माशीं परमसाम्य प्राप्त होतें.

ब्रह्म व जीव एकच किंवा भिन्न, किंवा भिन्न असून सारखेच ह्याविषयी मोठा वाद पंडितांमध्ये चालू आहे. ह्याविषयी मुंडकाचें स्पष्ट मत असें दिसतें की जीव आविष्कृत ब्रह्मच होय आणि त्या जीवाला जेव्हा अनाविष्कृत ब्रह्माचें ज्ञान होतें तेव्हाच त्याला स्वानंदाचें भान होतें व तो शोकापासून मुक्त होतो. ही मुक्तीच ब्रह्मप्राप्ति होय. ब्रह्मावस्थेंत निद्रेसारखें अद्वैत, अब्रह्मज्ञ जीवावस्थेंत द्वैत आणि ब्रह्मज्ञजीवावस्थेंत द्वैत दिसत असूनहि अद्वैताचा प्रत्यय असतो. ह्या तीनहि एकाच ब्रह्माच्या अवस्था होत. म्हणजे ज्याला ह्या होतात तो एकच आहे. सर्व उपनिषदांचा हाच अर्थ आहे. ह्या अवस्था खऱ्या किंवा खोट्या ह्या प्रश्नाचा विचार करण्यापासून कांही फ़ायदा नाही व तो प्रश्न मनुष्यास सोडविणेंहि शक्य नाही. दुःखकारक अशा द्वैतावस्थेचा त्याग करून आनंददायक अशा अद्वैतप्रत्यय जीवावावस्थेचें मनुष्याने सेवन करावें, हाच उपनिषदांचा भावार्थ आहे.

मुंडक ३ खंड १ श्लोक ४

प्राणो ह्येष यः सर्वभूतैर्विभाति ।
विजानन् विद्वान् भवते नातिवादी ॥
आत्मक्रीड आत्मरतिः क्रियावान् ।
एष ब्रह्मविदां वरिष्ठः ॥४॥

अर्थ--सर्व भूतांच्याबरोबर [सह] म्हणजेच ठिकाणीं दिसणारा जो प्राण तो हें ब्रह्मच [एष] असें जाणणारा तो त्या भूतांशीं अतिवाद करणारा होत नाही. [अतिवादी न भवते] म्हणजे तो दुसऱ्या जीवाशीं फार झगडत नाही. सर्वभूत संरक्षणापुरतेंच झगडेल. जास्त झगडत नाही. (तो हिंसा शक्य तितकी कमी करतो असा भाव आहे.) तो आत्म्याशींच क्रीडा करतो म्हणजे विषयांशीं क्रीडा करीत नाही, म्हणजेच विषयानंदत्याग करतो आणि आत्म्यांतच रममाण होतो म्हणजे आत्म्यांतच जो आनंद आहे त्याचें सेवन करतो. आणि चांगली कर्में करतो [क्रियावान्] म्हणजे सर्वभूतांना सुखकर होतील अशीं कर्में करतो. (विषयानंदाचा त्याग, आत्मा नंदाचें सेवन, सत्कर्म आणि सर्वभूतांशीं वाद न करणें हेंच त्याचें ब्रह्माशीं परमसाम्य होय असा ह्या श्लोकाचा भावार्थ आहे.) हा असाच मनुष्य [एष] ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ होय. ॥४॥

टिप्पणें--मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणे जो ब्रह्माशीं परमसाम्य पावला तो कसा वागतो तेंच ह्या श्लोकांत सांगितलें आहे.

"नातिवादी" म्हणजे काय ? उपसंहार प्यारा ७९ मध्ये ह्याचा विचार केलेला आहे. त्याचा सारांश असा; आत्मनाश झाल्याने जर पुष्कळ जीवांचें रक्षण होत असेल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तर ब्रह्मज्ञ आत्मनाश करून घेईल, आत्मरक्षण झाल्याने पुष्कळ जीवांचें रक्षण होत असेल तरच आत्मरक्षणार्थ झगडेल. ह्याप्रमाणे त्याच्या हातून हिंसा कमीतकमी होईल. दधीचि ऋषीने दुष्ट राक्षसांचा निःपात करण्याकरिता लागणारें वज्र बनविण्यास इंद्राला आपलीं हाडें दिलीं व त्याकरिता मृत्यु पत्करला. ह्या एकाच उदाहरणावरून दुष्टांचा नाश करण्याकरिता झगडावें आणि दुष्टांपासून सज्जनांचें रक्षण करण्याकरिता आत्मनाशहि स्वीकारावा असें दिसून येतें. हिंसा होईल तितकी कमी करावी हाच "नातिवादी" ह्याचा स्पष्टार्थ आहे.

"क्रियावान्"--"बुद्धिमान्" म्हणजे चांगली बुद्धि ज्याची आहे तो, त्याप्रमाणे "क्रियावान्" म्हणजे चांगली क्रिया ज्याची आहे तो, अर्थात् सत्कर्म करणारा' सत्कर्म म्हणजे सर्वभूतहित ज्याने होईल तें कर्म. श्री. शंकराचार्यांनी ज्ञान आणि कर्म ह्यांचा समुच्चय होऊं शकत नाही असें कारण देऊन, क्रियावान् ह्याचा ज्ञान-ध्यान-वैराग्यादि क्रियावान् असा अर्थ केला आहे. पण तें चूक आहे हें उघडच आहे. ज्ञानी कर्म करूंच शकत नाही असें नाहीच. श्लोक ३ मध्ये ईश्वरास "कर्तारम्" हें विशेषण लाविलें आहे. "अमनाः" असून जर ईश्वर कर्म करतो तर वासनारहित असूनहि जीवास कर्म करण्यास कोणतीच हरकत नाही. ज्ञानीहि मरेपर्यंत कर्म करू शकतो हें श्री. शंकराचार्यहि व्याससूत्र ४।१।१५ च्या भाष्यांत ज्ञानी देखील ज्ञानप्राप्तीनंतर कांही काळ पर्यंत म्हणजे आरब्धकार्य कर्में क्षीण होईपर्यंत जिवंत राहतो अर्थात् कर्में करतो असें म्हणतात. अर्थात् तशा स्थितप्रज्ञांच्या ठिकाणीं ज्ञानकर्मसमुच्चय संभवतो व तशाच स्थितप्रज्ञांचें ह्या श्लोकांत वर्णन आहे हें उघड आहे.

मुंडक ३ खंड १ श्लोक ५

सत्येन लभ्यस्तपसा ह्येष आत्मा।
सम्यग् ज्ञानेन ब्रह्मचर्येण नित्यम् ॥
अंतःशरीरे ज्योतिर्मयोहि शुभ्रो
यं पश्यंति यतयः क्षीणदोषाः ॥५॥

अर्थ—हा आत्मा म्हणजेच मागील श्लोकांत वर्णिलेली पूर्णानंदरूपी अवस्था सत्यानें आणि तपानें मिळते, म्हणजेच नेहमी [नित्यम्] खरें ज्ञान [सम्यग्-ज्ञान] आणि ब्रह्मचर्य म्हणजे विषयानंदत्याग ह्यांचें आचरण केल्याने मिळते. हा आत्मा शरीरांतच असतो. (शरीराशिवाय हा पूर्णानंदरूपी आत्मा असूं शकत नाही हा भाव आहे) तो शुभ्र म्हणजे आनंदरूपी प्रकाशाने चमकणारा आहे आणि ज्योतिर्मय म्हणजे आपल्या प्रकाशाने दुसऱ्या वस्तूंचें ज्ञान करून देणारा आहे. आणि प्रयत्न करणारे [यतयः] क्षीणदोष होऊन ह्यालाच पाहतात. ॥५॥

टिप्पणी—आत्मा मिळविण्याचीं दोनच साधनें सत्य आणि तपस् हीं ह्या श्लोकाच्या पहिल्या पादांत सांगितलीं आहेत. व दुसऱ्या पादांत त्या साधनांचेंच स्पष्टीकरण केलें आहे. सत्य म्हणजे सम्यग् ज्ञान आणि तपस् म्हणजे ब्रह्मचर्य असें तें स्पष्टीकरण आहे. ह्याप्रमाणें दिसेल की आत्मप्राप्तीचीं सत्य, तपस्, सम्यग् ज्ञान आणि ब्रह्मचर्य अशीं चार साधनें येथे सांगितली नसून सत्य म्हणजे सम्यग्ज्ञान आणि तपस् म्हणजे ब्रह्मचर्य (विषयानंदत्याग) हीं दोनच साधनें येथें सांगितलीं आहेत.

मुंडक ३ खंड १ श्लोक ६

सत्यमेव जयति नानृतम् ।
सत्येनपंथा विततोदेवयानः ॥
येनाक्रमंत्यृषयो ह्याप्तकामाः ।
यत्रतत्सत्यस्य परमं निधानम् ॥६॥

अर्थ—सत्य म्हणजे खरें ज्ञानच त्या आत्म्याला मिळविते [जयति]. अनृत म्हणजे खोटें ज्ञान त्या आत्म्याला मिळवूं शकत नाही. वासनारहित झाल्यामुळे-जे प्राप्तकामच असतात [आप्तकाम] असे ऋषि ज्या देवयान पंथाने, [येन] जेथे सत्याचा म्हणजे सम्यक् ज्ञानाचा परम विषय [निधानम्] म्हणजे ब्रह्म राहतें [यत्र] त्या ब्रह्मलोकीं जातात [आक्रमंति] तो देवयान मार्गहि सत्यानेंच घडविला [विततः] आहे. म्हणजे सत्याने मरणापूर्वी पूर्णानंदाची प्राप्ति होतेच शिवाय मरणानंतर त्यानेच देवयान पंथाने ब्रह्मलोकींहि जातो म्हणजे जन्ममरणापासून मुक्त होतो. ॥६॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिप्पणें—आत्मानंदाच्या प्राप्तीचे सत्य आणि तपस् हे जे दोन उपाय मागील श्लोकांत सांगितलें, त्यापैकी सत्य म्हणजे सम्यग्ज्ञान हेंच जास्त महत्त्वाचें आहे (कारण त्यानेच तपस् म्हणजे विषयानंदत्याग करण्याकडे प्रवृत्ति होते) म्हणून त्याचीच ह्या श्लोकांत स्तुति केली आहे.

मुंडक ३ खंड १ श्लोक ७-९

बृहच्च तद्दिव्यमचिंत्यरूपं ।
सूक्ष्माच्च तत्सूक्षतरं विभाति ॥
दूरात्सुदूरे तदिहांतिकेच ।
पश्यत्स्विहैव निहितं गुहायाम् ॥७॥
न चक्षुषा गृह्यते नापिवाचा ।
नान्यैर्देवैस्तपसाकर्मणा वा ।
ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्वः ।
ततस्तुतं पश्यते निष्कलंध्यायमानः ॥८॥
एषोणुरात्मा चतसा वेदितव्यः ।
यस्मिन्प्राणः पंचधा संविवेश ॥
प्राणैश्चित्तं सर्वमोतं प्रजानाम् ।
यस्मिन् विशुद्धे विभवत्येष आत्मा ॥९॥

अर्थ—सम्यग् ज्ञानाचा परमविषय जें ब्रह्म, तें मोठें आहे (कारण तें जगांत प्रत्येक ठिकाणीं आहे व जग मोठें आहे), तें लहानापेक्षाहि [सूक्ष्मात्] लहान [सूक्ष्म] आहे (कारण प्रत्येक लहान लहान अणूमध्येहि तें पूर्णपणें आपल्या सर्व धर्मांसह असतें), एकच वस्तू मोठी व लहानहि आहे अशी कल्पना मनास करता येत नाही म्हणून तें अचिंत्यरूप आहे. तें अतिशय दूर आहे (कारण अज्ञ मनुष्य त्याला पोहोचूं म्हणजे जाणूं शकत नाही) तें येथे जवळच आहे (कारण तें मनुष्याच्या हृदयाच्या गुहेंतच आहे)., तें दिव्य म्हणजे प्रकाशमान आहे (कारण त्याच्या प्रकाशानेच सर्व वस्तू दिसतात म्हणजे सर्व वस्तूंचें ज्ञान होतें), जेथे जीव त्याला पाहूं शकतात [पश्यत्सु जीवेषु] अशा ठिकाणीं येथेच म्हणजे ह्या शरीरांतच तें ठेवलेलें आहे. ॥७॥ ह्या शरीरांतच हें ब्रह्म ठेवलेलें आहे तथापि तें ब्रह्म डोळ्याला, वाणीला किंवा इतर कोणत्याहि देवांना म्हणजे इंद्रियांना ग्रहण करता येत नाही म्हणजे ज्ञात होत नाही. विषयभोगत्यागाने [तपसा] किंवा कर्मांनीहि तें ग्रहण केलें जात नाही. मनुष्य जेव्हा शुद्धबुद्धि [विशुद्धसत्त्वः] म्हणजे ऐंद्रियसुखाविषयी विरक्त होऊन खऱ्या सुखाचा शोध करणारा होतो तेव्हा विचार करून [ध्यायमानः] ज्ञानप्रसादाने म्हणजे सम्यग्ज्ञानाने त्या विभागरहित [निष्कल] ब्रह्माला पाहतो [पश्यते = पश्यति; आर्षप्रयोग] ॥८॥ हें ब्रह्म अणु म्हणजे सूक्ष्म असल्यामुळे एकाच देहांत तें पूर्णपणें राहूं शकतें म्हणूनच तें चित्ताला जाणतां येतें. आणि चित्तहि सर्व जीवांना आहेच. कारण त्या ब्रह्मांत पांच प्रकारचा प्राण प्रविष्ट झाला व त्या प्राणाबरोबरच सर्वप्रकारचे परिपूर्ण [सर्व] चित्त प्रजामध्ये ओवलें गेलें आणि तें शुद्ध झालें असता म्हणजे द्वैतादिप्रमादरहित म्हणजे सर्व जीवांस अद्वैत बुद्धीने पाहूं लागलें असता हा आत्मा मोठ्या वैभवास म्हणजे जीवन्मुक्तिपदास प्राप्त होतो [विभवति] ॥९॥

टिप्पणें--सम्यग्ज्ञानाचा परम विषय जें ब्रह्म त्याचें वर्णन सातव्या श्लोकांत आहे. त्याचें ज्ञान कसें होतें तें आठव्या श्लोकांत वर्णिलें आहे आणि नवव्या श्लोकांत त्या ब्रह्माचें ज्ञान प्रत्येक जीवास कां होतें त्याची उपपत्ति दिली आहे. ती अशी की प्राणाबरोबर चित्त असतें व चित्तामुळे ज्ञान होतें. चित्तशुद्ध होऊन हें ज्ञान झालें असता मूळचें अनाविष्कृत ब्रह्म आविष्कृत होऊन मोठ्या वैभवास म्हणजे जीवन्मुक्तिपदास प्राप्त होतें, असेंहि नवव्या श्लोकांच्या शेवटीं सांगितलें आहे.

निष्कल म्हणजे ज्याला कला म्हणजे विभाग नाहीत असें. हें विशेषण योजण्याचें कारण असें आहे की, ब्रह्म हें सर्व जगास व्यापून राहणारें असता जीवाला आपल्या एकट्याच्या हृदयांत पूर्णपणें कसें दिसेल अशी शंका येते, तिचें निवारण करणें जरूर आहे. तिचें निवारण असें; ब्रह्माला कला म्हणजे भाग नसल्यामुळे जेवढें ब्रह्म सर्व जगांत आहे तेवढेंच एका जीवाच्या हृदयांतहि आहे. म्हणून जीव त्याला पूर्णपणें पाहूं शकतो.

मुंडक ३ खंड १ श्लोक १०

यं यं लोकं मनसा संविभाति ।
विशुद्धसत्वः कामयते यांश्च कामान् ।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तं तं लोकं जयते तांश्च कामान् ।
तस्मादात्मज्ञं ह्यर्चयेद् भूतिकामः ॥१०॥

अर्थ—ज्या ज्या लोकांत म्हणजे मनुष्यसमाजांत जाण्याची तो वैभवास प्राप्त झालेला विशुद्धसत्व म्हणजे शुद्धबुद्धि म्हणजे सर्वत्र अद्वैत पाहणारा मनुष्य इच्छा करतो त्या त्या लोकांत तो जाऊं शकतो [जयते] आणि ज्या ज्या इच्छा तो करतो त्याच्या त्या त्या इच्छा पूर्ण होतात म्हणून स्वतःचें कल्याण व्हावें असें इच्छिणाऱ्या मनुष्याने [भूतिकामः] अशा आत्मज्ञाची पूजा करावी. ॥१०॥

टिप्पणः—"लोक"—लोक म्हणजे मनुष्यसमाज असा जो अर्थ मी करतो त्याला कांही जण विरोध करतील. पण "लोक" शब्दाचा हा अर्थ करून एकंदर श्लोकाचा जो अर्थ मी करतों त्याच अर्थाचें वचन श्रीमद्भागवतांतहि आहे. तें असें:—

नवाऽभवन्महाभागा मुनयो ह्यर्थशंसिनः ।
श्रमणावातरशना आत्मविद्याविशारदाः ॥२०॥
त एते भगवद्रूपं विश्वं सदसदात्मकम् ।
आत्मनो व्यतिरेकेण पश्यंतो व्यचरन् महीं
॥२२॥
अव्याहतेष्टगतयः सुरसिद्धसाध्य-।
गंधर्वयक्षनरकिंनर नागलोकान् ॥
मुक्ताश्चरंति मुनिचारण भूतनाथ-
विद्याधरद्विजगवां भुवनानिकामम् ॥२३॥
स्कंध ११ अ. २
विष्णोर्भूतानि लोकानां पावनाय चरंति हि
॥२८॥
स्कंध ११ अ. २

येथील "महीं" ह्या शब्दावरून "लोक" व "भुवनानि" हे पृथ्वीवरील मनुष्यसमाजच होत हें उघड आहे. अशा कोणत्याहि समाजांत जाण्यास त्या मुनींना त्या समाजांतील मनुष्य प्रतिबंध करीत नसत हें "अव्याहतेष्टगतयः" या शब्दाने स्पष्ट केलें आहे व तेंच ह्या उपनिषदांत "जयते" ह्या शब्दाने सांगितलें आहे. ह्याचें कारणहि भागवतांत दिलें आहे. तें "विश्वं आत्मनो व्यतिरेकेण पश्यंतः" हें आहे. येथेहि तेंच "विशुद्धसत्वः" ह्या शब्दाने सांगितलें. आहे अशा समदृष्टि मनुष्यास कोणीच प्रतिबंध करीत नाही हा अनुभवच आहे. कारण ते तरी सर्व लोकांना पावन करण्याकरितांच फिरतात. हें भागवतांत सांगितलेलें चरित्र ह्या श्लोकांत सांगितलें आहे हें उघड आहे.

विशुद्धसत्व म्हणजे अद्वैतनिष्ठ मनुष्यांसहि इच्छा कशा होतात अशी शंका घेण्याचें कारण नाही. अशा मनुष्यासहि स्वतःचें व इतरांचें प्राणधारण करण्यास आवश्यक तीं कर्मे करण्याची इच्छा होतेच. शिवाय आपणांस जें ज्ञान व सुख झालें तें इतरांसहि प्राप्त करून द्यावें ही इच्छा त्यास होतेच. ह्या इच्छा अद्वैतबुद्धिमुळेच होतात आणि त्या पूर्ण करण्याकरतांच तो कर्मे करीत असतो. आणि त्या इच्छा पूर्णहि होतात कारण इतर जीव त्यास त्या पूर्ण करण्यास मदतच करतात. हेंच ह्या श्लोकांत सांगितलें आहे. छांदोग्य ८ । १-५ । व त्यावरील आमचें विवरण पहा.

"विशुद्धसत्व" ह्याचा ह्या श्लोकांत आणि "विशुद्धचित्त" ह्याचा मागील नवव्या श्लोकांत आम्ही जो अर्थ घेतला आहे तो, आठव्या श्लोकांत "विशुद्धसत्व" याचा जो अर्थ केला आहे त्याहून भिन्न आहे. कारण ब्रह्मज्ञानाला आवश्यक तेवढीच शुद्धि आठव्या श्लोकांत अभिप्रेत आहे आणि नवव्या व दहाव्या श्लोकांत वैभवाला आवश्यक तेवढी शुद्धि अभिप्रेत आहे. अद्वैतनिष्ठेशिवाय वैभव प्राप्त होत नाही, हें उपनिषदाचें मत उघडच आहे.

पूजा करणें म्हणजे सत्कार करून संतुष्ट करणें व व उपदेश ऐकून त्याप्रमाणे वागणें.

मुंडक ३ खंड २

मुंडक ३ खंड २ श्लोक १

स वेदैतत्परमं ब्रह्मधाम ।
यत्रविश्वं निहितं भाति शुभ्रम् ॥
उपासते पुरुषं ये ह्यकामाः ।
ते शुक्रमेतदतिवर्तंति धीराः ॥१॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अर्थ—तो मागील खंडाच्या शेवटच्या श्लोकांत वर्णिलेला आत्मज्ञ [सः] हें ब्रह्माचें श्रेष्ठ धाम म्हणजे अवस्था म्हणजेच अद्वैतज्ञाची जागृतावस्था जाणतो. त्या अवस्थेंत जवळ ठेवलेलें [निहितं] हें विश्व आनंदप्रद [शुभ्रं] दिसतें. (बृहदारण्यक २।५ येथे हेंच सांगितलें आहे.) अशी ती अवस्था तो जाणतो. म्हणून त्या आत्मज्ञ पुरुषाची [तं पुरुषं] जे उपासना करतात ते ह्या शुक्राच्या म्हणजेच शुक्रजनित शरीराच्या पलीकडे जातात [अतिवर्तंति] म्हणजे अनेक प्रकारचीं दुःखें देणाऱ्या ह्या शरीरापासून त्यांना दुःख होत नाही (छांदोग्य ८।१२ येथेहि "अशरीरं" ह्या शब्दाने अशीच कल्पना व्यक्त केली आहे) किंवा एकाच शरीराच्या पलीकडे जातात म्हणजे सर्वभूतांच्या शरीरांत आपणच आहोंत असें मानतात, सर्वभूतीं एकच आत्मा आहे असें पाहतात म्हणजे अद्वैत मानतात, आणि अकाम होतात. ॥१॥

टिप्पणें—मागील खंडाच्या श्लोकांत ब्रह्मज्ञाची पूजा करावी असें सांगितलें. ह्या श्लोकांत त्या पूजेचें फळ उपपत्तिसह सांगितलें आहे. आत्मज्ञाची उपासना करतात म्हणून ते उपासकहि आत्मज्ञ होतात असा भावार्थ आहे. श्लोकांत "पुरुषं" ह्याच्या मागे "तं" हा शब्द घातल्यानेच श्लोकाचा अर्थ लागतो म्हणून तो शब्द घालून अर्थ केला आहे.

मुंडक ३ खंड २ श्लोक २

> कामान् यः कामयते मन्यमानः ।
> स कामभिर्जायते तत्रतत्र ॥
> पर्याप्तकामस्य कृतात्मनस्तु ।
> इहैव सर्वे प्रविलीयंति कामाः ॥२॥

अर्थ—जो आदरपूर्वक [मन्यमानः] म्हणजे आसक्तिपूर्वक कामांची इच्छा करतो, (त्याचें काम कधींच नाहीसें होत नाहीत आणि) त्या कामामुळेंच तो त्या त्या योनींत [तत्र तत्र] म्हणजे कामोपभोगास अनुकूल अशा योनींत जन्म घेतो. परंतु ज्यानें आत्म्याचें यथार्थ ज्ञान करून घेतलें आहे [कृतात्मनः] व त्यामुळें ज्याचें काम पर्याप्त म्हणजे सर्वभूतहित साधावें इत्यादि नियमांनी मर्यादित व त्यामुळे आसक्तिरहित असतात, त्याचें काम येथेच म्हणजे मरणापूर्वीच नाहीसें होतात. ॥२॥

टिप्पणें—ब्रह्मज्ञाची उपासना करणारा अकाम होतो असें मागील श्लोकांत म्हटलें आहे त्याची उपपत्ति ह्या श्लोकांत दिली आहे. ती उपपत्ति आम्ही उपसंहार प्यारे ४३-४५ येथे सविस्तर वर्णिली आहे ती पहा.

"पर्याप्त" हा शब्द भगवद्गीतेंत पहिल्या अध्यायांत "अपर्याप्तं तदस्माकम् बलं भीष्माभिरक्षितम् । पर्याप्तंत्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥१०॥" ह्या श्लोकांत आलेला आहे. तेथे त्याचा अर्थ, मर्यादित, लहान, थोडें असा आहे, तसाच अर्थ येथेहि घेतला आहे.

"कृतात्मा" कृत म्हणजे ज्ञानाने संस्कृत आहे आत्मा ज्याचा तो.

मुंडक ३ खंड २ श्लोक ३

> नायमात्मा प्रवचनेन लभ्यो ।
> न मेधया न बहुना श्रुतेन ॥
> यमेवैषवृणुते तेन लभ्यः ।
> तस्यैष आत्मा विवृणुते तनुस्वाम् ॥३॥

अर्थ—कठवल्ली २।२३ येथे हाच श्लोक आहे तेथे त्याचा अर्थ व टिप्पणें पहा. ह्याचा भावार्थ हाच आहे की ज्याला ईश्वराने श्रेष्ठ बुद्धि दिली असेल त्यालाच ती जीवन्मुक्तावस्था प्राप्त होते.

मुंडक ३ खंड २ श्लोक ४

> नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।
> नच प्रमादात्तपसोवाप्यलिंगात् ॥
> एतैरुपायैर्यतते यस्तु विद्वान् ।
> तस्यैष आत्मा विशते ब्रह्मधाम ॥४॥

अर्थ—ज्याचें शरीर सुस्थितींत नाही [बलहीनेन] ज्यास सत्याचें ज्ञान झालेलें नाही [नच प्रमादात्] आणि जो स्वाश्रमकर्तव्याचरणासहित तप म्हणजे विषयभोगत्याग करीत नाही [तपसोवाप्यलिंगात्] त्याला हा आत्मा म्हणजे जीवन्मुक्तावस्था प्राप्त होत नाही, म्हणजे पूर्णानंदाचा अनुभव येत नाही. परंतु शहाणा मनुष्य, शरीर सुस्थिति, सत्यज्ञान, आणि स्वाश्रमकर्तव्याचरणासहित तप ह्या तीन उपायांनी [एतैरुपायैः] प्रयत्न करतो त्याचा हा आत्मा ब्रह्मधामांत म्हणजे ब्रह्माच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रेष्ठ अवस्थेंत म्हणजे ब्राह्मी स्थितींत किंवा जीवन्मुक्तींत प्रवेश करतो. भगवद्गीता अ० २ श्लोक ७१।७२ ह्यांत जें सांगितलें तेंच येथेंहि सांगितलें आहे. ॥४॥

टिपणें—"ब्रह्म धाम" हा शब्द येथे व मागील पहिल्या श्लोकांतहि आला आहे. त्याचा अर्थ भगवद्गीतेंत सांगितलेली ब्राह्मी स्थिति हें उघड आहे.

"लिंग" म्हणजे आश्रमचिन्ह म्हणजे त्या त्या आश्रमाचें कर्तव्य. "लिंग" म्हणजे संन्यासाश्रम असा अर्थ पूर्वीचे टीकाकार करतात. पण ज्यामुळे असा अर्थ केला पाहिजे असें कांहीं कारण दिसत नाहीं. "लिंग" म्हणजे आश्रमचिन्ह हाच मूळ अर्थ आहे व त्यांत विशिष्ट आश्रम दाखविण्याचें सामर्थ्य नाहीं.

"प्रमाद" म्हणजे चूक, भ्रांति, असत्य ज्ञान, मुंडक ३।१।६ मध्ये निर्दिष्ट केलेलें अनृत.

मुंडक ३ खंड २ श्लोक ५

संप्राप्यैनमृषयो ज्ञान तृप्ताः ।
कृतात्मानो वीतरागाः प्रशांताः ॥
ते सर्वगं सर्वतः प्राप्य धीराः ।
युक्तात्मानः सर्वमेवाविशंति ॥५॥

अर्थ—ह्या ब्राह्मी स्थितीला [एनं] प्राप्त झालेले, ज्ञानतृप्त, कृतात्म, निष्काम, प्रशांत आणि ज्यांचा आत्मा ब्रह्माशीं युक्त झाला [युक्तात्मानः] असे शहाणे [धीराः] ऋषि, सर्वांच्या हृदयांत असलेल्या [सर्वगं] ब्रह्माला सर्वत्र [सर्वतः] प्राप्त होऊन म्हणजे पाहून सर्वांच्या हृदयांत प्रवेश करतात म्हणजे सर्वभूतें आपण आहों असें मानतात. ॥५॥

टिप्पणें—भगवद्गीता ६।२९ येथे जें सांगितलें आहे तेंच येथे दुसऱ्या शब्दांनी सांगितलें आहे.

मुंडक ३ खंड २ श्लोक ६

वेदांतविज्ञानसुनिश्चितार्थाः ।
संन्यासयोगाद् यतयः शुद्धसत्वाः ॥
ते ब्रह्मलोकेषु परांतकाले ।
परामृताः परिमुच्यंति सर्वे ॥६॥

अर्थ—वेदांतामध्ये सांगितलेल्या ज्ञानानें ज्यांनी अर्थ म्हणजे खरें काय आहे तें सुनिश्चित करून टाकलें आहे, आणि ज्यांनी प्रयत्न करून [यतयः] कामसंन्यासाच्या योगानें म्हणजे साधनानें आपलें चित्त शुद्ध केलेलें आहे, ते सर्व मरणाच्या काळीं [परांतकाले] ब्रह्मलोकीं म्हणजे ब्राह्मीस्थितींत परम आनंदाचा अनुभव घेणारे [परामृताः] होत्साते, जन्म मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होतात. [परिमुच्यंति] ॥६॥

टिप्पणेः—भगवद्गीता २।७२ येथे जें सांगितलें आहे तेंच येथेंहि सांगितलें आहे. "संन्यास" म्हणजे कर्मसंन्यास असा अर्थ न घेतां कामसंन्यास असाच अर्थ घेतला पाहिजे, कारण मुंडक ३।१।४ येथील "क्रियावान" हा शब्द कर्मत्यागाच्या विरुद्ध आहे. येथील श्लोक ४ येथील "बल" आणि "अलिंग" हे शब्दहि कर्मत्यागाला विरुद्धच आहेत.

"ब्रह्मलोकेषु" येथील बहुवचनाचें कारण श्री. शंकराचार्यांनी फार उत्तम दिलें आहे. ते म्हणतात "साधकानां बहुत्वाद् ब्रह्मैव लोको ब्रह्मलोक एकोपि अनेकवद् दृश्यते प्राप्यते वा अतो बहुवचनं ब्रह्मलोकेष्विति ब्रह्मणीत्यर्थः"

मुंडक ३ खंड २ श्लोक ७

गताः कलाः पंचदश प्रतिष्ठाः ।
देवाश्च सर्वे प्रतिदेवतासु ॥
कर्माणि विज्ञानमयश्च आत्मा ।
परेऽव्यये सर्व एकीभवंति ॥७॥

अर्थ—ब्राह्मीस्थितींतील मनुष्य मरतो तेव्हा त्याच्या शरीराच्या प्राण वगैरे पंधरा कला, आपापल्या कारणांमध्ये [प्रतिष्ठाः] मिळून जातात आणि त्याची श्रोत्रादि इंद्रियें [देव] आपल्या दिगादि प्रति देवतांमध्ये मिळून जातात. त्याचीं कर्में आणि विज्ञानमय आत्मा म्हणजे जीवात्मादेखील सर्व पर म्हणजे श्रेष्ठ अव्यय ब्रह्मांत जाऊन मिळतात म्हणून त्याचें शरीर पुनः बनत नाही अर्थात् तो पुनः जन्मत नाही.

टिप्पणें—मागील ६ व्या श्लोकांत जें सांगितलें त्याची उपपत्ति ह्या श्लोकांत दिली आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडक ३ खंड २ श्लोक ८

यथानद्यः स्यंदमानाः समुद्रे ।
अस्तं गच्छंति नामरूपे विहाय ॥
तथा विद्वान् नामरूपाद्विमुक्तः ।
परात्परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥८॥

अर्थ--ज्याप्रमाणें वाहणाऱ्या नद्या आपलें नामरूप सोडून देऊन समुद्रांत जाऊन अस्तास पावतात, त्याप्रमाणेच, ब्रह्मज्ञ [विद्वान्] आपल्या नामरूपापासून मुक्त होऊन, पर अशा जीवाच्याहि पर म्हणजे पलीकडे असलेल्या पुरुषाला म्हणजे अनाविष्कृत ब्रह्माला जाऊन मिळतो. ॥८॥

टिप्पणें--ह्या व मागील श्लोकांतील वर्णन प्रश्नोपनिषद् ६।१-५ ह्यांतील वर्णनांशीं फारच जुळतें. येथील पंचदशकला व विज्ञानात्मा मिळून सोळा व तेथील सोळा कला एकमेकांशीं जुळतात. नदीसमुद्राची उपमा व योजलेले शब्द दोनहि ठिकाणीं एकच आहेत. ह्यावरून प्रश्नोपनिषदानंतर मुंडक झालें ह्या सिद्धांतास पुष्टीच येते.

ह्या श्लोकांत विदेहमुक्ति वर्णिली आहे. ती जीवन्मुक्ताला मृत्युकालीं मिळते असें सहाव्या श्लोकांत सांगितलें. त्यापूर्वीच्या श्लोकांत जीवन्मुक्ति वर्णिली आहे.

मुंडक ३ खंड २ श्लोक ९

स योह वैतत्परमं ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति ।
नास्याब्रह्मवित्कुले भवति, तरति शोकम्
तरति पाप्मानं, गुहाग्रंथिभ्यो विमुक्तोऽमृतो
भवति ॥९॥

अर्थ—ह्याप्रमाणें जो तें परम ब्रह्म जाणतो तो ब्रह्मच होतो. त्याच्या कुळांत अब्रह्मज्ञ उत्पन्न होत नाही, तो शोकाला आणि पापाला तरून जातो आणि गुहेंतील वासनारूपी ग्रंथीपासून मुक्त होऊन परमानंदाचा अनुभव घेणारा [अमृत] होतो.

टिप्पणें—अमृतः ह्याचा अर्थ "मरणरहित" असा घेतांच येत नाही. कारण ब्रह्मज्ञ मरतो हें श्लोक ६ मधील "परांतकाले" ह्या शब्दावरून स्पष्ट आहे.

मुंडक ३ खंड २ श्लोक १०

क्रियावंतः श्रोत्रिया: ब्रह्मनिष्ठाः ।
स्वयं जुह्वत एकर्षिंश्रद्धयंतः ॥
तेषामेवैतां ब्रह्मविद्यां वदेत ।
शिरोव्रतं विधिवद् यैस्तु चीर्णम् ॥१०॥

अर्थ--ज्यांनी वेदांचें अध्ययन केलें आहे [श्रोत्रियाः] ब्रह्मज्ञानी होऊन त्या ज्ञानानुरूप वागण्याची ज्यांना निष्ठा म्हणजे पक्की आवड आहे [ब्रह्मनिष्ठाः] जे सत्कर्म करणारे आहेत [क्रियावंतः,] मुख्य ऋषि जो प्राण [एकर्षि] त्याला स्वतः आहुति देणारे [स्वयं जुह्वतः] म्हणजे प्राणधारणार्थ स्वतःच मेहनत करणारे, म्हणजे संन्यास्याप्रमाणे दुसऱ्यावर अवलंबून न राहणारे, ब्रह्मज्ञानाची उत्कट इच्छा ज्यांना आहे [श्रद्धयंतः], आणि ज्यांनी शिरोव्रताचें योग्य रीतीनें आचरण केलें आहे अशांनाच ही ब्रह्मविद्या सांगावी. ॥१०॥

टिप्पणें—"ब्रह्मनिष्ठः" हा शब्द मागेंहि मुंडक १।२।१२ येथे आला आहे. त्याचा तेथे जो अर्थ केला आहे त्याहून भिन्न अर्थ येथे करावा लागला आहे. कारण तेथें तो गुरूचें विशेषण आहे व येथे शिष्याचें विशेषण आहे.

"एकर्षि"—प्रश्नोपनिषदांत २।११ येथे मुख्य प्राणाला "एकर्षि" म्हटलें आहे म्हणून येथे एकर्षि म्हणजे "मुख्य प्राण" असा अर्थ केला आहे. श्री. शंकराचार्यांनी "एकर्षि" म्हणजे अग्नि असा अर्थ केल्यामुळे त्यांना "स्वयं" ह्या पदाचें स्वारस्य सांगतांच आलें नाही.

शिरोव्रतम्—"शिरसि अग्निधारण लक्षणं व्रतम् आथर्वणानां प्रसिद्धम्" असें म्हणजे डोक्यावर अग्निधारण करण्याचें अथर्व वेदामध्ये सांगितलेलें व्रत असें सर्व टीकाकार म्हणतात. पण तें कोठें सांगितलें आहे त्याचा मला पत्ता लागला नाही. ह्या व्रताला मनाचा फार पक्केपणा किंवा बुद्धीचा प्रगल्भपणा लागत असला पाहिजे म्हणून तें व्रत हें शिष्याची परीक्षा पाहण्याची युक्ति होय असें दिसतें. किंवा शिरोव्रत म्हणजे शिरसि म्हणजे गुरूजवळून ऐकण्याच्यापूर्वी करावयाचें व्रत जें प्रश्नोपनिषदांत १।२ येथे सांगितलें तें म्हणजे ज्ञानाच्या उत्कट इच्छेने वेदांचा अभ्यास व स्वतंत्र विचार करणें. असेंच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन विदर्भाचें काव्य

श्री. नारायण नागोराव हूड

(लेखांक ३ रा)

आतां बरोबरी तुजमज !

नामदेवाचें कार्य विश्वांतील गूढें पाहण्याबरोबरच समाजजागृति करण्याचें, असें द्विविध प्रकारचें होतें. नामदेवाच्या कार्याचा प्रभाव राजपुताना, पंजाब वगैरेमध्ये, सर्व हिंदुस्थानभर पडलेला होता. कबीर, नानक, विष्णुस्वामी, बहरोदास, जल्लोसुतार, लधाखत्री इत्यादि अनेक संतांनी त्यांच्या कार्यापासून स्फूर्ति घेतली. नामदेवाचे पन्नास साठ अभंग शिखांच्या ग्रंथसाहेबांत आहेत. 'नामदेवाची मुखबानी' या नावाचें वगैरे त्यांचे दुसरे ग्रंथहि पंजाबांत प्रसिद्ध आहेत. पंजाबांत व राजपुतान्यांत त्यांची अनेक देवळें व स्मारकें दिसून येतात. थोडक्यांत म्हणजे उत्तर हिंदुस्थान हा एके काळीं 'नामदेवमय' झालेला होता. आजहि त्यांच्या तत्वज्ञानाचा तेथें व महाराष्ट्रांत प्रभाव कमी नाही ! नामदेवाला आपल्या आत्मिक श्रेष्ठपणाची येवढी जाणीव होती की " वदहु कीन होइ मावऊ मोसिऊ ठाकुर ते जनु, जन ते ठाकुर, खेलु परिउ है तोसिऊ" (हे ईश्वरा ! मी तुझ्याशी पैज मारतो की तुझ्यांत व माझ्यांत फरक काय ?) 'वरे आम्हा कळों आले देवपण । आता बरोबरी तुज मज ! ! ' 'देईन प्रसंगी शिव्या तुज···निलाजऱ्या तूज नाही याती कुळ···चोरटा शिंदळ ठावा जना '···नामा म्हणे केशवा काय तुझी भीति? ···संतमहंता देखत सांगेन तुझी खोड··· अशा तऱ्हेचें आवाहन त्यांनी ईश्वराला अनेक वेळेला दिलेलें आहे. हा आत्मविश्वास त्यांच्या आत्मप्रत्ययांतूनच निर्माण झालेला आहे. नामदेवासारखा श्रेष्ठ प्रतिभेचा व योग्यतेचा संतकविश्रेष्ठ महाराष्ट्रांतच काय पण अखिल भारतांतहि, एकाद दुसरा अपवाद सोडून बहुधा झाला नाही, असें म्हटलें असतां, त्यांत अतिशयोक्तीचा दोष येऊं नये. प्राध्यापक निरंतर यांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाचा परामर्ष' या ग्रंथांत " ज्ञानेश्वराने ज्ञानेश्वरीच्या द्वारें जो भगवत्प्राप्तीचा 'सुलभ ! ' (यांतील अवतरणचिन्ह माझें आहे) मार्ग सांगितला, त्याचा प्रचार नामदेवाने केला. ज्ञानेश्वर हा त्या मार्गाचा आद्य भाष्यकार व नामदेव हा आद्य प्रचारक होय " हें जें विधान केलें (पान १२७) तें बरोबर वाटत नाही. नामदेवांच्या पराकोटीच्या श्रेष्ठ काव्या-

---

(पान १० वरून)

व्रत केल्याशिवाय गुरूने सांगितलेलें बरोबर समजणार नाही हें उघडच आहे आणि हेंच पुढील श्लोकांत सांगितलें आहे. म्हणून शिरोव्रतं ह्याचा खरा अर्थ हाच असावा.

मुंडक ३ खंड २ श्लोक ११

तदेतत्सत्यमृषिरंगिराः पुरोवाच ।
नैतदचीर्णव्रतोऽधीते ।
नमः परमऋषिभ्यः ।
नमः परमऋषिभ्यः ॥११॥

अर्थ—हें तें खरें असलेलें ज्ञान अंगिरा ऋषीने पूर्वकालीं सांगितलें. ज्याने व्रतांचें म्हणजे मागील श्लोकांतील शिरोव्रताचें आचरण केलें नाही त्याला तें ज्ञान समजूं शकत नाही [अधीते]. हें ब्रह्मज्ञान ज्या ऋषीपासून प्राप्त झालें त्या श्रेष्ठ ऋषींना नमस्कार असो, त्या श्रेष्ठ ऋषींना नमस्कार असो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरून व कार्यावरून नामदेव हा ज्ञानेश्वरांच्याच तोडीचा, स्वतंत्र प्रतिभेचा, महान द्रष्टा संतकवि होता याबद्दल शंका राहत नाही !

एकनाथांनीहि 'भक्तिप्रेमावीण ज्ञान नको देवा–अभिमान नवा नित्य तयामाजी' हेच उद्गार काढून भक्तीची नितांत श्रेष्ठता दर्शविलेली आहे. व भक्तीच्या जोरावर 'पाहो गेलो देवालागी–देवरूप झालों अंगीं' असे उद्गार काढलेले आहेत. श्रीकृष्णाने उपदेशिलेल्या ज्ञानाच्या आधारावर, एकनाथांनी उभारलेल्या भागवत एकादशस्कंद टीकाग्रंथावरूनहि, जें ज्ञान भगवंताने प्रत्यक्ष, रमेला, गोपींना व गरुडालाहि सांगितलें नाही, तें त्यांनी आपला प्रेमळ भक्त जो उद्धव त्यास सांगितलें असेंच दिसून येते. एकनाथांची प्रतिभा अमूर्तांचें गूढ पाहण्यांत व व्यक्त करण्यांत ज्ञानदेव, नामदेव यांच्या इतकी देदीप्यमान नसली, तरी त्यांची काव्य रचना कमी मोलाची नाही. दीप्तिमान प्रतिभेची उणीव त्यांनी ब्राम्हण्याच्या कमंठ पोलादी चौकटीच्या काळांत श्राद्धाच्या दिवशी, ब्राम्हणांच्या आगोदर अत्यंजांना जेवूं घालून, उन्हांत तळमळत असलेल्या अंत्यजाच्या मुलाचा शेंबूड व लाळ पुसून, हरिजनाकडे जेवावयास जाऊन, व रामेश्वराला नेत असलेल्या कावडींतील पाणी रासभाला पाजण्याचें अलौकिक कृत्य करून, पुरेपूर भरून काढलेली आहे ! व्यावहारिक व कुशल मेहनती कारागिरी रचनेच्या खडकाखाली, भक्तीच्या जिव्हाळ्याचे निर्झर त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं प्रतीत होतात. भक्तीधर्माच्या साधनाने राव–रंक, ब्राम्हण–चांडाळ एका समान मार्गांत आणून विपरीत काळांत, जवळजवळ पाहिल्याने आपल्या आचरणाने खरा समाजसत्तावाद प्रस्थापित करणाऱ्या, या विदर्भस्य कवीपुढे कोण मस्तक नम्र करणार नाही ?

विदर्भ कवींत, मुक्तेश्वराचें काव्य संतकाव्यापेक्षा बरेंच निराळ्या वर्तीचें आहे. कला कवींत मुक्तेश्वराचें स्थान श्रेष्ठ आहे. मुक्तेश्वराची कविता वाचत असतां मृदु–मुलायम अशा भाषाशैलीच्या 'शरदृतू'च्या स्वच्छ चांदण्यात सहल कल्याचा कांही ठिकाणीं भास झाल्या-शिवाय रहात नाही !

दुःखावर मलमपट्या !

त्यानंतरच्या विदर्भाच्या संतकवींत देवनाथ, दयालनाथ व विष्णु कवि हे आपापल्या काव्यतेजाने तळपत आहेत ! 'कोइ दिन धोती हु लंगोटी । कोइ दिन नंगे पीर' या देवनाथांच्या उक्तीप्रमाणे या सर्वांनी फकीरीच स्वीकारली होती. दयाळनाथांसारखा पुत्रापेक्षाही जास्त ऋणानुबंधी असा, अनंत जन्मीचा जोडीदार जेव्हा देवनाथांना प्राप्त झाला, तेव्हा 'माझे निजरूप मज भेटलें । झाली भेटी पडली मिठी । अंतर्बाह्य प्रकाशलें ।।' असेच हृदय उचंबळविणारे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. प्रकाश ! प्रकाश ! अंतर्बाह्य प्रकाश ! या मूळ तत्वाकरताच सर्व श्रेष्ठ चिंतकांची, द्रष्टया कवींची 'फकिरी' आहे ! याच तत्वाकरता त्यांनी घरादारावरहि तिलांजली दिली. 'एषोऽस्य परमानंदः' 'एतस्यैव आनंदस्य अन्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति' (यासच अंतिम व शेवटचा आनंद म्हणतात) असे श्रुतीने सांगितलें आहे. त्या महा-नंदाची कल्पना सामान्य जनास येणेंच शक्य नाही. खरा प्रकाश–अंतिम सत्य कळल्याखेरीज मानवजात खऱ्या अर्थाने सुखी होणारच नाही ! आम्हाला खरा प्रकाश मिळत नाही ! 'We are groping in the dark !' सगळे बाह्य विश्व सूर्यप्रभ विद्युत् प्रकाशाने तळपत आहे; पण अंतःकरणांत अंधारच आहे ! बाह्य सुधारणा सर्वत्र वाढत आहे; पण मनें क्षुद्र बनत आहेत ! आता मानव जातीच्या दुःखावर केवळ मलमपट्या लावणें सुरूं आहे ! काही प्रकाश पहातात पण एकादा दुसरा किरण प्रतीत होऊन पुन्हा अंधार पडतो ! म्हणूनच 'घडिभरि पडे मग्रेच ऊन–अभ्री तेही जात उडून–मग म्हणावे हरे रामरे करावें कसें ?' हें म्हणावें लागते. गटे सारखा कवि 'I want more light–more light' असा आक्रोश करतो ! प्रकाश म्हणजेच ज्ञान आहे ! संतांची कविता प्रकाशमय आहे ! त्यामुळे 'स्वयंज्योति' वगैरेंचे अनेक उल्लेख अनेक संतकाव्यांत आले आहेत. प्रकाश म्हणजेच खरें ज्ञान, खरें मार्गदर्शन, शिव आणि सौंदर्य आहे !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दयाळनाथांचा 'ये धावत कृष्णाबाई' 'हीन दीन मतिमंद माझि स्थिति कां केली ?' 'दोष हे आचरावे हेची आम्हा उचीत। तव पदीं ब्रीद गर्जे तारावे पतित' इ. व इतरहि कांही पदें भक्तिरसानें काठोकाठ ओथंबलेलीं आहेत.

उपरोक्त कवींत विष्णुकवीची कविता अत्यंत उत्कृष्ट आहे. त्यांच्या कवितेचें वर्णन 'विरागी–विलासी' या शब्दसमुच्चयानें करता येईल. वैराग्य काव्याबद्दल ते जितके प्रसिद्ध आहेत त्यापेक्षाहि विलास काव्याबद्दल जास्त ख्यात आहेत. लोकांस सर्वसाधारणत: शृंगार जेवढा रुचतो, तेवढें वैराग्य पचत नाही ! आणि तें साहजिकच आहे. त्यामुळे त्यांच्या लावण्या गोडीनें म्हणण्यांत व ऐकण्यांत येतात. मात्र अशा प्रकारच्या काव्याविषयी एक गोष्ट ठळकपणे लक्षात घ्यावयास पाहिजे, म्हणजे रसग्रहणाची बहार वाढून कवीला जो अन्याय होण्याचा संभव असतो तो टळेल. काव्यावरून कवीची मन:प्रवृत्ति दिसून येत असल्यामुळे अशीं, काव्यें लिहिणाऱ्याची मनोवृत्तीच 'छचोर' वा 'रंगेल' असावी, असें मत प्रस्थापित होण्याची परिस्थिति निर्माण होते. या लावण्या वाचून निदान सामान्य लोक तरी त्यांचा सामान्यच अर्थ घेतात ! अर्थात प्राचीन वाङ्मयांत वैराग्याचें शृंगारीकरण करणें, हा प्रकार प्रचलित असला तरी ऐकणाराच्यावर त्यांचा वैषयिकच ठसा उमटत असतो. लोकांच्या लक्षांत अभिजात कविता जास्त न राहतां नेमक्या अशाच तऱ्हेच्या ओळी त्यांच्या रसनाग्रावर खेळतात. मुक्तेश्वरसारख्याच्या काव्यांतील कांही सुंदर काव्याचे भाग सोडून, शर्मिष्ठेनें नदीमध्ये अंग धुतल्यानंतर, ती वस्त्र गुंडाळीत असता, वाऱ्यानें तें उडून गेल्यामुळे तिची उडालेली तारांबळ, दुष्यंताचें कण्व ऋषीच्या पश्चात् शकुंतलेशीं भाषण, रूपवती द्रौपदीनें पंक्तींतील वाढण्याचें वेळचें वर्णन हेंच नेमकें लोकांच्या दृष्टींत भरतात. त्यावरूनच केवळ कवी-विषयी मत वाईट होण्यासारखें असतें. सर्वच कवींनी बहुधा प्रणयी भावनांचे तरंग उडविलेले आहेत. लौकिकांत ज्या भावना बोलून जाणें अभिरुचीस सोडून होते, त्या काव्यांत बहुधा व्यक्त करण्याची कवीस मुभा असते. एखादा कलाकार एखादी उघडी नागडी, वा अर्धनग्न मूर्ति तयार करील, त्यांत त्याचा उद्देश उदात्त विचाराचें वा कल्पनेचें प्रगटीकरण करण्याचाच असतो; पण त्या कलेचें ग्रहण करण्याकरता रसिकहि उच्च पातळीचा असावा लागतो, नाहीतर त्याचे परिणाम वाईट होतात.

भला भला मोरीजान !

विष्णु कवींनी या लावण्या पूर्ववयांत लिहिल्या किंवा उत्तरवयांत लिहिल्या हें समजण्याला मार्ग नाही. कदाचित् त्यांनी त्या उत्तरवयांत लिहिल्या असण्याचाहि संभव आहे. या लावण्या शृंगारपर नसून वैराग्यपरच आहेत असें आवर्जून सांगावेसें वाटतें. संतकवींच्या लावण्या किंवा शृंगारिक पदें, ही रामजोशी, होनाजी-बाळ, प्रभाकर इत्यादि शाहीरांच्या काव्याप्रमाणे वाच्यार्थानें घेणें बरोबर होणार नाही. शाहीरी कवींची मनोवृत्ति व जीवन रंगेल थाटाचें होतें, संतकवींचें जीवन वरवर शृंगारात्मक वाटत असलें तरी, त्याखाली वैराग्याचा ज्वलंत अग्नि पेटलेला होता.

उदाहरणार्थ—

" उठा महाराज द्वार उघडा। कडी काढा !
केव्हाची उभी मी द्वारी
चौरंगि स्वच्छ न्हालें
जरीचें पातळ मी ल्यालें
दिवस आजि चवथा ! "

या पंक्तींत स्त्रीनें पतीला केलेली संभोग शृंगारासंबंधीची उघड उघड विनंति आहे. या लावणीचा अर्थ शृंगारात्मक घेतला तरी त्यांत हानि नाही. कारण काव्यांत कांही मार्मिक व काव्यमय असल्यास तें बहुधा अश्लील म्हणता येणार नाही; तरी पण संतकवीसारखा द्रष्टाकवि अशा मनोवृत्तींत गुंगतो हें कित्येकांस प्रशस्त न वाटणारें आहे. पण या लावणीचा तत्त्वज्ञानात्मक अर्थ घेतला असतांना दोषाचें कारणच राहत नाही.

वरील लावणींत वरवर उत्तान शृंगार असला तरी त्यांत प्रच्छन्नपणे भक्ताचें आर्त हृदयच व्यक्त केलेलें आहे. ईश्वर दाराची कडी लावून बसलेला आहे, म्हणजे दर्शन देत नाही. भक्तरूपी पत्नी ईश्वरास

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणत आहे 'दार उघडा'. येथे भक्ताची ईश्वर मीलनाची पराकाष्ठेची आर्तता व्यक्त झालेली आहे. 'चौरंगि स्वच्छ न्हाले' याचा अर्थ चौरंगावर बसून स्वच्छ स्नान केलें, किंवा चौरंगांनी न्हालें, म्हणजे स्नानाच्या उपकरणांनी यथासांग न्हालें असाहि अर्थ होईल. परमेश्वराकडे जात असता 'स्वच्छ' होऊन निर्मल शरीरानेच गेलें पाहिजे; किंवा परमेश्वराकडे जात असता भक्त नैसर्गिकपणेच स्वच्छ होत असतो. 'चौरंगी स्वच्छ न्हाले' याचा पुढेहि जास्त हृद्य अर्थ लावता येतो. स्नान करून शरीराने स्वच्छ होऊन परमेश्वराकडे जशी जाण्याची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे मनानेहि स्वच्छ होऊन गेलें पाहिजे. " इंद्रियें, मन, अहंकार व बुद्धि या मार्गांनी सर्व वस्तूंचें ग्रहण करून त्यांचा भोग, 'पुरुषा'ला 'प्रकृति' कडून दिला जातो " सर्व वस्तूंचें ग्रहण करण्याकरतां शरीराच्या सर्व भागावरील मळाचें आवरण दूर करणें अपरिहार्यच आहे, ही सांख्यकारिकेमधील कल्पना कवीने येथे कळत वा न कळत मांडलेली आहे असें वाटतें. प्रकृति ही कर्तृत्ववती व पुरुष हा 'उदासीन' हें सांख्य तत्त्वज्ञानाचें रहस्यच या कवितेंत कवीने ओतलें आहे असा भास होतो. विष्णुकवी हे सांख्य मताचे नसले तरी, मोठमोठ्या श्रेष्ठ अद्वैतवादी चिंतकांना देखील द्वैताचा 'ससेमिरा' जाणवल्याशिवाय राहत नाही हें ध्यानांत घेतलें, म्हणजे त्यांच्याहि तत्त्वज्ञानांत अशा छटा–तरंग क्वचित निर्माण का होतात याचा उलगडा होणे कठीण पडत नाही. बी कवींच्या चांफा या नितांत मनोहर गीतांतहि 'चाफा बोलेना–चाफा हालेना—चाफा खंत करी काही केल्या फुलेना ......आणि नंतर...चाफा फुली आला फुलून...कोण मी कोठे दोघेजण ? '...याहि काव्यांत ही सांख्यदर्शनांतीलच कल्पना व्यक्त झालेली आहे, हें आनुषंगानें सांगावेसें वाटतें ! 'दिवस आजि चवथा' म्हणजे मनाची अकथित, अनश्रुत अशी अत्यंत अनिर्वचनीय आनंदाची पण त्याच बरोबर अतिशय आतुरतेची अशी चवथी उन्मनी अवस्था, (मीलनोन्मुख) ती येथे या चरणाने ध्वनित झालेली आहे. अशा तऱ्हेचे खोल अर्थ साधारणतः लावण्यांतून निघतात. वानगीकरता एक पद्यपंक्ति दिली आहे. 'भला भला मोरीजान् खूषीसे यव करना दोस्ती !' इत्यादि लावण्या बरबर थिल्लर, आचरट व भयंकर उत्तान भासतात; पण त्या अतिशय सोज्वळ, गंभीर व नवीन दृष्टिकोन विशद करणाऱ्या आहेत, एवढेच स्थलाभावास्तव फक्त येथे लिहितों.

अपउपीवा !

आणि कदाचित् असें धरून चाललें की हीं गीतें कांहीशा वैषयिक मनःप्रवृत्तींतून लिहिलेलीं आहेत, तरी ब्राम्ही स्थितींत असलेल्या द्रष्टया कवीच्या नीतिमत्तेला त्याने कांही बाधा येत नाही. कारण कर्माचें बंधन अशा व्यक्तींना नाही. भक्त हा भक्तीने सळसळत असला पाहिजे. म्हणजे अक्षय आनंदाने 'फुंजत' असला पाहिजे. ही स्थिति येथें हें महत्त्वाचें आहे. ती नसेल तर इतर सर्व खटाटोप व्यर्थ आहेत. कित्येकांची अशी समजूत आहे की भक्त हा मटक्याची उसळच खाणारा असला पाहिजे, व कांदा लसूणासारख्या पदार्थापासून दूर पळणारा असला पाहिजे ! किंवा त्याने नियमित स्नान करून शुचिर्भूत झालेंच पाहिजे ! जयदेव कवीनें ब्राम्ही स्थितींत असलेल्या भक्त कवीचें–ब्रम्हविद्येने खरें ज्ञान हस्तगत झालेल्याचें जें एका महाराष्ट्री भाषेंतील कवनांत उत्कृष्ट वर्णन केलें आहे त्यांतील

चंद सत भेदिआ। नादसत पूरिआ...
अबल बलु तोडिआ। अचल चलु थपिआ
अघडु घडिआ। तहा अपउ पीवा

(शेकडो चंद्रांचा भेद करून व सर्व नादांना पुरून उरलेल्या, शेकडो सूर्यांचें तेज स्वाधीन करून ठेवलेल्या ब्रम्हतत्त्वाची महति काय वर्णावी, ज्या ब्रम्हविद्येने अबलांना बल मिळतें, उन्मत्तांना बलहीन करता येते, तसेंच अघटित घटना घडवून आणणेंहि ब्रम्ह तत्त्वज्ञानी पुरुषाला अशक्य नाही, फार काय पण अपेय अशा पेयाच्या प्राशनानेहि त्याला कोणतीच बाधा होऊं शकत नाही...) इ. ओळीवरून वरील समजुतींची व्यर्थता लक्षांत येते ! खरा भक्त हा सृष्टिसौंदर्यापासून दूर पळणारा नसून शाश्वत सृष्टिसौंदर्याचा व परमेश्वराच्या शाश्वत सौंदर्याचा मनमुराद आस्वाद

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घेणारा रसिक सौंदर्योपासक आहे ! मात्र हें सौंदर्योपासकत्व क्षुद्र किल्मिषाने डागाळलेलें नसावें. जो सौंदर्यात्मक, प्रकाशात्मक, सौरभात्मक विचारचिंतनजलाचें अहोरात्र अभ्यंग स्नान करीत असतो, त्याला दररोज लक्स साबूने स्नान करण्याची काय आवश्यकता आहे ? स्नान बहुधा ब्राम्ही स्थितींत वर्ज्य असावें, असें संत कवींच्या जीवनांत बरेच उल्लेख आढळतात ! व ते विचारार्ह आहेत.

हीं सर्व कर्मबंधनें व्यावहारिक आहेत, तीं समाजाच्या धारणेकरता पाळलीं पाहिजेत, पण जी विभूति त्याच्या पलिकडे गेली तिला त्यांची कांही आवश्यकता नाही ! अर्थात त्या व्यक्तीने तसें करावें, व समाजाने तिची वाहवा करावी असें कोणीच म्हणणार नाही ! व ती व्यक्तीहि तसें अर्थातच करीत नाही. ईश्वराचा भक्त हा केव्हाहि निर्मलच असतो, पण कर्माकर्माचें शुचि अशुचित्वाचें तो फारसें अवडंबर माजवीत नाही ! शुचिर्भूत होण्याची अट्टाहासाने खटपट करणें म्हणजे आपण अशुचि आहोंत असाच न्यूनगंड मनांत बाळगणें होय ! 'शौचात् स्वांग–जुगुप्सा' (शुचि भावनेचा शेवट स्वतःच्या शरीराविषयी किळस वाटण्यांत होतो) असा योगसूत्रांत स्पष्ट इशारा आहे ! नामदेवांनीहि 'व्रत तप न लगे करणें सर्वथा न लगे तुम्हा तीर्था जाणे तया' असें म्हटलें आहे.

विष्णुकवींनी सुद्धा भक्तीचें श्रेष्ठत्व वर्णन करतांना 'न ये भक्तीचे मोल। ब्रम्हांड गोल तोलता !' असाच निर्वाळा दिलेला आहे. आयुष्य हें फार थोडें व ध्येय फार मोठें तेव्हा घाई केली पाहिजे हे दर्शविण्याकरिता 'चालला दिवस् हान् गाडी। मारतिल चोर आघाडी' अशी एका उत्कृष्ट कवितेंत त्यांनी टोचणी दिलेली आहे. विष्णुकवीच्या काव्याचा दुसरा भाग मात्र सरस नाही एवढें येथे नमूद करावेसें वाटतें.

वरील प्रमुख कवि–कवयित्री खेरीज विदर्भांत अनेक संत कवी झाले त्याची मोजदाद कोठवर करावी ? अमृतराय, हंसराजकवि, वणीचे गोविंदकवि, प्राकृत सप्तशतीवरील ओवीबद्ध टीका करणारे उत्तम श्लोक, विठ्ठल किंकर, गोसावी नंदन इत्यादि कवीनींहि चांगली कविता लिहिली आहे. याशिवाय उमरखेडची उत्तम श्लोकाची, व चिन्मयानंदाची, सुरजी अंजनगावची देवनाथांची, उमरावती जिल्ह्यांतील मारकीनाथांची, व शिवदिन केसरीची; कारंज्याची कल्याणाची इ. अनेक कवि–शाखा अस्तित्वांत येऊन त्याची अप्रकाशित काव्यकृति कित्येक मठामठांत धूळ खात पडलेली आहे !

LUCERE-DEORE

संतांची कविता निवृत्तिमार्गी होती व ते समाजपराङ्मुख होते, म्हणून समाजास व राष्ट्रास त्याच्या काव्याचा विशेष उपयोग झाला नाही, असे कधी कधी कांही विद्वानांकडून ध्वनित केलें जातें. संतांची कविता निवृत्तिपर असली तरी ती आनंदवादी व सौंदर्यवादी आहे; हें अंतिम शक्तीच्या 'रूप पाहता लोचनी–सुख जाले वो साजणी' इत्यादि शेकडो, शरीरिणी सौंदर्यात्मक, शब्द–चित्र विलासावरून व प्रतिमा–प्रतीकांवरून सहज दिसून येते. या आनंदवादाचाच समाजालाहि सर्वांत जास्तीत जास्ती उपयोग आहे, हें विचारांती कोणासहि पटण्यासारखें आहे. संतांचा आनंद हा त्यांच्या भक्तींतूनच निर्माण झाला, व त्या भक्ती व आनंद यांतूनच सौंदर्यवादाचाहि जन्म आहे. भक्तिवाद म्हणजेच आनंदवाद व सौंदर्यवादहि आहे ! कारण आनंद हा सौंदर्यामुळेच उत्पन्न होत असतो. अर्थात अंतिम अवस्थेंत हें सौंदर्य बाह्य नसून, आंतरिक असतें. अंतिम सार्वभौमसत्तेचें 'सत्यं, शिव, सुंदरम्' म्हणजे सौंदर्य हें जें एक प्रमुख वैशिष्ठ्य, त्याचाच संतकवींनी आकंठ आनंद लुटून, आपल्या अमृतमय वाणीने आनंदवादी काव्य अस्तित्वांत आणलें. अर्थात त्यांत 'शिव'हि आलेंच. अंतिम सत्तेचें स्वरूप तत्वज्ञ हे सत्याच्या मार्गाने, संत हे शिवाच्या मार्गाने व कवि हे सौंदर्याच्या मार्गाने पहात असतात. खरा भक्त हा बहुधा उच्च प्रकारचा संत, उच्च प्रकारचा तत्वज्ञ, व उच्च प्रकारचा कवीहि असतो. एवढेंच नव्हे तर तो श्रेष्ठ सौंदर्योपासकहि असतो.

कविता होता होईल तो आनंदवादीच असावी असें माझें मत आहे. मी या प्रश्नाकडे अगदी निराळ्या दृष्टीने पहातों. त्याकरता माझ्या 'नवा प्रकाश' (हें काव्य सात हजार ओळीचें, असें पहिल्या लेखांकांत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होतें; तेथे नऊ हजार ओळींचें असें पाहिजे) व 'निरुपमा' या काव्यांत विशद केलेल्या अनेक दृष्टिकोनांपैकी एका प्रमुख दृष्टिकोनाविषयी येथे लिहावें लागेल. 'नवा प्रकाश' हें काव्य 'निरुपमा' काव्याच्या अगोदरच्या बंडखोरी अवस्थेंतील आहे. त्यांत पाश्चात्य व पौर्वात्त्य तत्वज्ञानांतील कांही सिद्धांत बरोबर कसे वाटत नाहीत, हें रसात्मक पद्धतीने दाखवून, कांही नवीन सिद्धांत मांडलेले आहेत. 'निरुपमा' हें बारा हजार ओळीचें काव्य सौंदर्यवादावर आधारलेलें आहे. निरुपमा म्हणजे आदिशक्ति (Bright force) निराम म्हणजे कधी कधी ईश्वर व बहुतेक वेळीं भक्त (Devotee) व विकराल (Dark-force) याच्यामधील संबंधांचें, प्रसंगाचें, भावनांचें, वादविवादांचे वा परिहास–विजल्पितांचें नाटयरूपाने या काव्यांत चित्रण करून, त्यांत श्रद्धायुक्त तत्वज्ञानाच्या प्रमुख सिद्धांताच्या सूक्ष्मांतील सूक्ष्म छटांचें विश्लेषण केलेलें आहे. या काव्यांतील परिच्छेदांत, ध्यास, भास, स्वप्नें, प्रणय, नवीन छंद इत्यादिकांचा अमूप उपयोग केल्यामुळे, कल्पनाशक्तीला, रसात्मकतेला, श्रद्धेला (conviction) व मनोरंजकतेलाहि बराच वाव मिळालेला आहे. या दोन्ही दीर्घ काव्यांनी विफलतावादी काव्ययुगाला थोडीशी कां तरी होईना, कलाटणी मिळेल, अशी माझी नम्र अपेक्षा आहे.

वरील दोन्हीहि काव्यांत, विवेचिलेलें कांही सिद्धांत, माझ्या विदर्भसंशोधनांतील विवेचिलेल्या कांही थोड्या सिद्धांताशी विरोधी वाटतील. व्यक्तीच्या जीवनांत तत्वज्ञानाच्या बाबतींत साधारणतः निरनिराळ्या अवस्था (stages) येत असतात; त्यामुळे कधी कधी पूर्वीच्या सिद्धांतांत सुधारणा होणें अपरिहार्य होते. माझ्या उपरोक्त ग्रंथांत विवेचिलेलें कांही सिद्धांत, या लेखांत विवेचिलेल्या सिद्धांताचे पूर्वपक्ष आहेत, असे धरून चालले तरी त्यास हरकत नाही. मात्र तें कांही सिद्धांत मला आता मंजूर नाहीत.

'आनंदवादाचाच पुरस्कार कवींनी कां करावा' या मताच्या स्पष्टीकरणाकरता माझ्या 'निरुपमा' व विशेष: 'नवा प्रकाश' या दोन काव्यांत व्यक्त झालेल्या दृष्टीकोनापैकी, एक प्रमुख व बहुधा मीच प्रथम असंदिग्धपणे असा विवेचिलेला नावीन्यपूर्ण दृष्टिकोन, शास्त्रीय परिभाषा वगैरे टाळून सूत्र रूपाने खाली देत आहे.

अखिल ब्रह्मांडाची अंतिम शासन कर्त्री शक्ति समजतात त्याप्रमाणे 'obsolute' नाही, तर त्या दोन तुल्यबळ शक्ति (co-ordinate powers) आहेत. त्या म्हणजे प्रकाशशक्ति (Bright force) व तम शक्ति (Dark force) या होत. प्रकाश शक्ति ही सर्व विश्वाला सत्य, न्याय, शिव, अहिंसा सौख्य वगैरे जें जें सुंदर आहे, तें देत असते; व तम शक्ति ही विश्वाला असत्य, अन्याय, अशिव, हिंसा, दुःख वगैरे असुंदर आहे तें वितरीत असते. या सिद्धांताला मी सध्यापुरतें 'LUCERE-DEORE-POUVOIR' THEORY व मराठींत 'भृंगसिद्धांत' असें नांव दिलें आहे. कित्येकांना हा सिद्धांत अत्यंत विक्षिप्त भासण्याचा संभव आहे. कोणताहि अत्यंत नावीन्ययुक्त सिद्धांत पहिल्याने वसाच भासतो, एवढें म्हटलें म्हणजे पुरे. तत्वज्ञानाच्याच नव्हे, तर काव्याच्या दृष्टीनेहि हा सिद्धांत कदाचित् क्रांतिकारक ठरेल. हा सिद्धांत खरा ठरल्यास कर्मवादाच्या पुनर्जन्माच्या व इतरहि कांही प्राचीन सिद्धांताचा पुनर्विचार करावा लागेल.

हा सिद्धांत केवळ कल्पनेवर आधारलेला नसून कांही वर्षांच्या चिंतनांतून निर्माण झालेली सुसंगत विचारप्रणालीची सुसंबद्ध साकळी (link) आहे. या सिद्धांताच्या योगाने तत्वज्ञानांतील कित्येक प्रश्नांचा सुसंगत अर्थ लागतो. विश्वाचा प्रलयकाल होऊन सर्व ब्रह्मांडास ब्राम्ही स्थिति प्राप्त होईपर्यंत, या प्रकाश व तमशक्तीमुळे सुंदर व असुंदर, न्याय व अन्याय, शिव व अशिव, हिंसा व अहिंसा, सौख्य व दुःख इत्यादिकांचा झगडा चालतच राहणार आहे ! विश्वांतील एकीकडचे सौख्य–दुःख दुसरीकडे जाईल किंवा विश्वांत एका कालखंडांत किंवा युगांत सौख्य नांदेल तर दुसऱ्या कालखंडांत किंवा युगांत दुःख येईल. कारण विश्वाचा मार्गच वर्तुळाकार प्रकाशशक्ति (याला आपण सध्यापुरतें ईश्वर म्हणूं) व तमशक्ति (याला आपण सध्यापुरते असुर म्हणूं.) या दोनहि शक्ति तुल्यबळ असल्यामुळे ईश्वर सुद्धा सर्व विश्वावर एकदम सौख्य, न्याय, अहिंसा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वगैरे आणण्यास असमर्थ आहे. ईश्वराला जर असें वाटलें की जगांत आज चाललेले, किंवा नेहमी असलेले अन्याय, दुःखे, हिंसा काढून टाकावी तर त्याला ती एका मिनिटांत काढून टाकतां येतील! पण तसें होत नाही. एक तर तीं त्याला काढून टाकायचीं नाहीत; किंवा दुसरें असें की तो तीं काढून टाकण्यास समर्थ नाही. म्हणजे ईश्वर हा समजतात तसा सर्वज्ञ, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान नाही! तर एका दृष्टीनें अगतिकच आहे. मात्र अद्वैत सिद्धांताप्रमाणे, सृष्टीच्या संपूर्ण विनाशाच्या वेळीं, किंवा नंतर, Dark force व Bright force या दोन्हीहि शक्ति एकरूप होऊन त्यांचें अद्वैत बनतें. व यावेळीं ईश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व सर्वसाक्षी असा होतोच. ही अद्वैताची कल्पना जिवा-शिवाच्या अद्वैताच्या कल्पनेपेक्षा अर्थातच फार निराळी आहे आणि हेंच खरें अद्वैत होय. पण या अद्वैताचा निदान मानवी जीवनाला तरी कांहीच उपयोग नाही! सारेंच ब्रह्म बनल्याबरोबर ब्रह्म आनंदरूप असल्या-मुळे (आनंदो ब्रह्मेति व्यजानात्) व प्रत्येक व्यक्ति त्याचा अंशच असल्यामुळे तीहि आनंदरूपच होते; पण वैयक्तिक रीतीने आनंदमय न होतां ब्रह्माचा कणशः एक भाग म्हणून होते; व तसें झालें असतांना 'कुमु-दिनी काय जाणे परिमळ' या न्यायाने तिला आनंदाचा उपभोग घेतां येत नाही.

भृंग सिद्धांत

उपरोक्त भृंगसिद्धांताच्या योगाने, व्यक्ति आज जो ऐश्वर्य किंवा दुःखाचा भोग भोगत आहे, तो तिच्या पूर्व जन्मींच्या कर्माचा परिपाक आहे, हा सिद्धांत बरोबर ठरणार नाही. कारण प्रकाशशक्ति ही सर्व व्यक्तींना सर्व चांगलें देण्याचा प्रयत्न करते; पण तमशक्ति तें त्याच्यापासून हिराऊन घेते. प्रत्येक व्यक्तीचें जीवन दोनहि शक्ति घडवितात. व तसेंच समाजाचें, राष्ट्राचें, जगाचें व विश्वाचेंहि. प्रकाश शक्तीचें प्राबल्य झाल्यास व्यक्ति, समाज वगैरेंत वैभव व सुवर्णयुग येतें व तमशक्तीचें प्राबल्य झाल्यास दुरवस्था व कृष्णयुग येतें. म्हणूनच ऐश्वर्य वगैरे आलें आणि ऐश्वर्य वगैरे गेलें, असे आपल्याला व्यक्ति, समाज, राष्ट्र, जग व विश्व यांत दिसून येतें.

सृष्टींत बदल होऊं शकत नाही, असें मत 'पारमे-नायडीज' या तत्ववेत्याने मांडलेलें आहे. सृष्टींत वर-वरचा बदल वरचेवर होतोच; पण मूलगामी बदल होऊं शकत नाही. (जग सुधारण्याच्या नादीं लागल्यानें काय दुष्परिणाम होतात हे तुकारामांनी आपल्या एका अभंगांत चांगल्या तऱ्हेने दाखविलें आहे!) कारण सृष्टीची उत्पत्ति, वृद्धि व लय हीं प्रत्येक वेळीं होत जाणार; व प्रत्येक वेळीं नवीन सृष्टि त्याच क्रमाने उत्पन्न होऊन लय पावत जाणार! अंतिम सत्याच्या दृष्टीने पाहिलें तर, पाटीवर रेघोटचा काढणें व पाटी-वरील रेघोटचा मोडणें, यासारखीच सर्व सृष्टीची घटना आहे. म्हणूनच शंकराचार्यांचा 'ब्रह्मसत्यं जग-न्मिथ्या' हा सिद्धांत अत्यंत मूळगामी वाटतो. शंकरा-चार्यांचे बरेचसे सिद्धांत अत्यंत मूलगामी व त्रिकाला-बाधित आहेत एवढेंच येथे नमूद करून ठेवावेसें वाटतें. मानव प्राणी जोपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत प्रेम, आनंद, राग, काम, लोभ इत्यादि विकार राहणारच. सृष्टीचा प्रलय झाल्यावर, वरील दोन शक्तींनी पुन्हा कोणी अगदीच निराळचा तत्त्वाचा प्राणी बनविला तरच हे विकार समूळ नष्ट होतील. अशा स्थितींत तो मानव प्राणी न राहतां कांहीतरी वेगळाच प्राणी होईल!

कर्मवादाचा सिद्धांत हा मूलतःच अनेक कारणा-करता बरोबर नाही. एकतर मागच्या जन्मींच्या कर्माप्रमाणे फळ मिळतें, असें जरी गृहीत धरून चाललें, तरी ज्यावेळेला सर्वांचे अगदी प्रथम जन्म होते, त्यावेळीं प्रत्येक प्राणी निर्लेप (clean slate) अवस्थेंतच होता. त्यानंतर एका प्राण्याला सत्कर्म करण्याची व दुसऱ्या प्राण्याला दुष्कर्म करण्याची बुद्धि कां व्हावी हें कळत नाही! हें बहुधा कोठेच सांगितलें नाही. त्यामुळे कर्मवादाचा पायाच भुसभुशीत आहे! त्याच-प्रमाणे मनुष्यजन्मामध्ये कर्म हें बुद्धिपुरःसर होत नाही; त्यामुळे ह्या जन्मांतील कर्मांना पापपुण्याच्या दृष्टीनें कांहीच किंमत नाही! सापेक्षतावादाप्रमाणे कालाचे वर्तमान, भूत, भविष्य असे भाग पडत नाहीत; तर काल हा अखंड आहे. हें शास्त्रीय सत्य आहे. म्हणून सर्व प्राण्यांच्या सर्वच क्रिया एकाच वेळीं घडत

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत असें म्हणतां येतें. त्यामुळे संचित, प्रारब्ध, क्रियमाण इत्यादि कर्माचे प्रकार संभवूंच शकत नाहीत ! पूर्वकर्म काय केलें; कोणत्या कर्माबद्दल प्राणी दुःख भोगत आहे, हें जोंपर्यंत कळणार नाही, तोंपर्यंत कोणतीहि व्यक्ति कर्माबद्दल उदासीनच राहील. अमुक एका कर्माबद्दल अमुक एक शिक्षेचें दुःख होत आहे, असें आरोपीला सार्थ न्यायालय देखील अगोदर कळवीत असतें ! एकाच दिवसांतील पापपुण्याचा ताळा जमविणें कठीण; तर शेकडों जन्मांमधून येत असतांना, आणि प्रत्येक जन्माचें कर्म-अकर्म अज्ञात व कित्येक ठिकाणीं अखंडित असतांना कोणाच्या जमानांवें किती पापपुण्य पडलें आहे, हें कसें कळणार ? ईश्वर किंवा चित्रगुप्त हिशेबाचें खातें ठेवतो ही कल्पनाहि हास्यास्पद आहे ! निदान त्याने एकएक कालखंडाचा हिशोब व्यक्तीस द्यावा व त्या त्या कर्माबद्दल त्या त्या कालखंडाच्या शेवटीं व्यक्तीस शिक्षा करावी ! व्यक्तीच्या हातून अकर्म झालें तर, त्याला पुढचा जन्म हीनतेचाच येणार व त्यामुळे त्या जन्मास तो आणखीच कुकर्में करत जाणार ! व्यक्ति ज्या परिस्थितींत असते, त्या परिस्थितीचा मुख्यतः व्यक्तीच्या कर्मा-अकर्मांवर परिणाम होतो; म्हणजे ती कर्में अपरिहार्यत्वानें, तिच्या मनांत नसतांहि करावींच लागतात; त्या कर्मांना ती व्यक्ति जबाबदार कशी राहील ? शिवाय एका समाजांत व कालांत जें एक सत्कर्म असतें तेंच दुसऱ्या समाजांत व काळांत कुकर्म होतें, कर्मावर भक्ति नसेल तर कर्म चांगल्या तऱ्हेने होऊंच शकणार नाहीं; ज्ञानाचा जन्म ज्याप्रमाणे भक्तींतून आहे, त्याचप्रमाणे कर्माचाहि जन्म भक्तींतूनच आहे; आणि भक्ति हा सहज धर्म असल्यामुळे, ती हुकमी उत्पन्न होईलच असें नाही; म्हणूनच कर्महि हुकमी होईलच असें नाही. मी कर्म करतो या जाणीवेनें कर्म केलें तर, अहंकार उत्पन्न होतो. म्हणजे तें पुण्य की पाप ? बरें जाणीव न ठेवतां कर्म करावें तर त्याचा परिणाम कार्यास कां चिकटावा ? पार्थिव जीवनांत मात्र कर्माचे परिणाम कार्य-कारण भाव दिसूनच पडतात; व त्याला महत्व आहेच; पण आत्मिक जीवनाच्या दृष्टीनें विचार करतां, त्यांचें क्षेत्र अत्यंत मर्यादित आहे. विष्णु कवीच्या काव्याबद्दल लिहितांना मागें या मुद्याबद्दल लिहिलेलेंच आहे. या व आणखी इतर अनेक कारणांकरता हा कर्मसिद्धांत लंगडा आहे तें मी आपल्या काव्यांत विस्तृत दाखविलें आहे.

व्यावहारिक सामाजिक राष्ट्रीय किंवा जागतिक दृष्टीने कर्ममार्गाचाच पुरस्कार करणें इष्टच नव्हे तर अत्यावश्यक आहे ! कारण जीवनांत निदान उदरंभरणाचें किंवा ऐहिक सुस्थिति मिळविण्याकरता कर्म केलें नाही, तर मनुष्याचा लवकरच ग्रंथ आटोपावयाचा ! त्यामुळे प्राचीन ग्रंथांतून कर्मवाद काढून समाजाला कार्यान्वित ठेवणें हें अत्यंत महत्वाचें कर्तव्य आहे. मूर्त व अमूर्त, सत्य व सत्याभास याचे मार्गच अत्यंत परस्पर विरोधी आहेत. एक जड व दुसरा चैतन्ययुक्त. एकाला धरलें तर दुसऱ्याला सोडावेंच लागतें. अंतिम सत्याच्या दृष्टीने कर्मवाद बरोबर नाही.

मोक्ष व दगड !

वरचा मुद्दा मी विस्तृतपणे एवढ्या करतांच चर्चिला की, जगांतील दुःख हें वर दाखविल्याप्रमाणें कालत्रयींहि कमी होण्यासारखें नाही. जग कार्यान्वित होण्याकरता ज्याप्रमाणे कर्मवादाची शिकवणूक द्यावी लागते, त्याचप्रमाणे, या दुःखाला तोंड देण्याकरता आनंदवादाची शिकवणूक देणें हें अत्यंत श्रेष्ठांतील श्रेष्ठ कर्तव्य आहे. याचा अर्थ असा नव्हे की प्रत्येक कवीनेच आनंदवादाची शिकवणूक दिली पाहिजे. ज्याच्या प्रतिभेला जसें पेलेल तसें तो करील; कारण काव्य प्रांतांत सर्वच भावनांना व रसांना स्थान असल्यामुळे, त्यांचेंहि प्रकटीकरण करणें आवश्यकच आहे. पण विफलतावादाने भांबावून जाण्यापेक्षा जगांतील आनंद लुटण्याकडेच मनाची प्रवृत्ति शेवटपर्यंत कायम ठेवली पाहिजे. आणि व्यक्ति ही ब्रह्माचाच अंश असल्यामुळें व ब्रह्म हें आनंदरूप असल्यामुळे त्याचा आनंद घेण्याचा नैसर्गिक कल आहेहि. मात्र व्यावहारिक व कमी प्रतीचा आनंद सोडून शाश्वत अंश तऱ्हेचा आनंद लुटण्याची शिकवण दिली पाहिजे व ती वर्तनांत आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील आनंदाची परमावधि एवढी जावयास पाहिजे की जन्म, जरा, मृत्यु कोणत्याहि स्थितींतून व्यक्ति जात असली तरी, त्या ब्रह्मानंदाच्या आनंदांत तिला त्याची जाणीवच होऊं नये; आणि ही स्थिति येथें शक्य आहे. भक्तीच्या आनंदानें सळसळणें हीच जीवाची ब्राम्ही अवस्था होय व ती अमर अक्षय झाली म्हणजे तोच प्रत्यक्ष परमेश्वर व मोक्ष होय ! परमेश्वर दुसरा तिसरा कोणी नाही ! या स्थितींत कोणत्याहि योनींत प्राणी गेला तरी त्याची ब्रह्मानंदानें सळसळण्याची स्थिति कायम राहील. त्या योनींतील दुःखाची जाणीव त्या ब्रम्हानंदांत विरून जाईल. मोक्ष मिळणें म्हणजे जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतूनच फक्त मुक्तता मिळणें असें नाहीं. कारण 'मोक्ष तो होऊनि पडणें नोहे दगड !' कोणत्याहि योनींत असतांना भक्तीच्या आनंदानें सळसळणें हाच खराखुरा मोक्ष आहे ! भक्तीच्या आनंदांत नेहमी गर्क राहणें याचाच अर्थ असा की जगांतील सर्व चांगल्या गोष्टींचें म्हणजेच सौंदर्याचें चिंतन करणें; व सृष्टींतील दुःखाच्या बाजूचें त्या विचारांचें समूळच उच्चाटण करणें होय. सौंदर्यचिंतनानें जेवढा आत्मविकास होईल, जेवढा आत्मा उजळेल व विशाल होईल तेवढा दुसऱ्या कशानेच होणार नाही ! किंबहुना परमेश्वरप्राप्ति होण्याकरता सौंदर्यचिंतनाइतका दुसरा श्रेष्ठ उपायच नाही !

'नवा प्रकाश' या काव्यांत कदाचित् क्वचित शून्यवादाची छटा असली तरी, त्यांत विफलतावादाचा मात्र अंशहि नाही. कारण त्या काव्यामध्ये केवळ सौंदर्यात्मक विचारांनाच मनांत थारा देऊन, असौंदर्यात्मक जेवढें आहे, तेवढ्यास मनांत शिरूंच न देण्याचा प्रयत्न करणें ही कल्पना आहे. 'विराट वृषभास' या माझ्या एका काव्य परिच्छेदांत दुःखरूपी भैरव वृषभ मनांत शिरत असतांच त्या मनोद्वाराशींच श्रीकृष्णशक्तीने त्याचीं शिंगें मोडून तेथेच त्याला नष्ट करावयाचें ही कल्पना मी चित्रित केलेली आहे. म्हणजेच केवळ सौंदर्यवादी व आनंदवादी विचारांनी आत्मा विकसित करून त्याचें परमेश्वरांत परिवर्तन करण्याचा प्रयत्न होण्याची कल्पना दिग्दर्शित केली आहे.

आघाताशिवाय नाद !

ईश्वर ज्या अर्थी डोळ्यानें दिसत नाही, कानानें ऐकूं येत नाही; व त्याचें अस्तित्व प्रत्यक्ष प्रमाणानें कळूं शकत नाही, त्या अर्थी ईश्वर नाही, असें बुद्धिप्रामाण्य वाद्यांचें म्हणणें आहे. ईश्वराला कान पकडून पुढे उभा करून 'हा पहा ईश्वर' असें दाखविणें ही ईश्वराबद्दलची कल्पनाच चुकीची आहे. ईश्वर हा बाहेरून आणतां येण्याजोगा कोणी प्राणीच नाही ! तो अंतरांतच आहे ! जीवनस्थितींत असतानांच ब्रह्माएवढा व ब्रह्मासारखा शाश्वत ब्रह्मानंद भोगणें, व त्यानंतरहि तसाच शाश्वत भोगत राहणें हेच ईश्वर होणें होय. तैत्तिरीय उपनिषद् ३-५ येथे वर्णिलेला आनंदमय आत्मा म्हणजेच आनंदपूर्ण जीवात्मा ब्रह्मच होय. "आनंदमयोऽभ्यासात्" या व्याख्येवरून व्यासानें जाहीर केलें आहे की, जीवस्थितींतील आत्यंतिक आनंदाची अवस्था म्हणजेच जीवन्मुक्ति ! हेंच जीवाचें परम साध्य होय. आणि ती स्थिति प्राणपणाच्या परमोत्कट भक्तीमुळे येते. किंवा भक्ति हेंच त्याचें दुसरें नांव आहे. कांही तत्वज्ञ भक्ति हें साधन आहे असें समजतात, तेंहि बरोबर नाही. भक्ति हेंच साध्य आहे ! त्या व्यक्तीला सार्वभौम सत्तेचे सर्व अधिकार मिळालेलेच असतात; पण ते अधिकार वैभवहि तो आपल्या ब्रह्मानंदांत उपभोगण्याचे विसरून जातो ! त्या स्थितींत त्याला परमज्ञान होत असतें. भक्तींतून ज्ञानाचा जन्म आहे हें मी मागे लिहिलेंच. पण त्या परमज्ञानाचीहि त्याला महती वाटत नाही. मुकुंदराजांनी अशा ब्राह्मी स्थितींत असलेल्या व्यक्तीलाच 'गुरु' म्हणून संबोधिलेलें असून ईश्वरापेक्षाहि त्याचें श्रेष्ठत्व जास्त आहे, असें विवेकसिंधूंत वर्णिलेलें आहे. कारण ईश्वर विश्वाची घडामोड करण्याच्या भानगडींत तरी पडतो; पण गुरु तसें न करतां केवळ शाश्वत ब्रह्मानंदांत 'फुंजत' असतो ! बुद्धीनें ही स्थिति येत नाही; बुद्धीची मर्यादा फक्त पार्थिवापर्यंतच आहे. मुख्य प्रश्न आनंदानें (अक्षय) फुंजण्याचा आहे. त्या स्थितींतील व्यक्ति प्रत्यक्ष कोणत्याहि वस्तूशिवाय तिचा उपभोग घेऊं शकते; म्हणजे भोक्ता व भोक्तव्य हे एकच होतात ! नामदेवाला आघाताशिवाय नाद, दिव्याशिवाय प्रकाश,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिसतच होता. अशा स्थितींत तो अखिल विश्वाशि-वायहि अखिल विश्वाचें राज्य भोगूं शकतो! परमेश्वर बाहेर नाही तो आंतच आहे; मात्र तें स्वतःसच प्रतीत होण्याचा प्रश्न आहे! जेव्हा मनामध्ये कांही अनिर्वचनीय, अत्यंत श्रेष्ठ प्रकारचा सात्विक आनंद निर्माण होण्यास सुरुवात होईल त्यावेळेला ही स्थिति येत आहे असें समजण्याला हरकत नाही; म्हणूनच वरील सर्व कारणांकरता 'आनंदवाद'च प्रस्थापित करणें हें सर्वांत महान् असें कर्तव्य होय व व तें श्रेष्ठ कर्तव्य कांही अंशीं विदर्भस्थ संत कवींनी केलेलें आहे.

संतकवींचा आनंदवाद (म्हणजे कित्येकांच्या दृष्टीने निवृत्ति किंवा नैराश्यवाद!) व इतर कांही कवींचा विफलतावाद यांत मूलगामी फरक आहे. संतांचा आनंदवाद हा या जगाविषयीचा उदासीनतावाद नव्हे. त्यांत केवळ पारलौकिक म्हणजे इहजगताच्या पलीकडीलच अमर आनंद घेण्याची प्रवृत्ति नाही, तर या जगांतच संपूर्ण आनंद घेण्याची कल्पना आहे. परलोकांत संतांनी त्याच्या मृत्यूनंतर जो काय आनंद घेतला असेल तो असेल, पण या जगांतहि संपूर्ण असा आनंद घेतला होता व व्यावहारिक व ऐश्वर्यवान लोकांपेक्षाहि किती तरी अधिक पटीने. मात्र त्यांची आनंदाची कल्पना व्यावहारिक आनंदापेक्षा निराळी होती. व्यावहारिक आनंद हा अल्पकाळचा असून आनंदाभास आहे, हें सांगणें नकोच. खरा संतकवि हा सृष्टीकडे अखंड आनंदवृत्तीने पाहात असतो. तो आनंद लुटत असतां इहजगतांतील नाना तऱ्हेचीं संकटें, आमय, दुःखें यावद्दलची त्याची जाणीवच लुप्त झालेली असते; व मृत्यूनंतरहि तेंच. मी अशा कवीला 'भृंगवादी' कवि म्हणतों. भृंग ज्याप्रमाणे फुलांतील कंटकाचा व कीटकाचा बिलकूल विचार न करतां फुलांतील केवळ मधाचा आनंद लुटणेंच जाणत असतो, तसेंच या कवीचें हि आहे. पतंग हाहि ज्योतीवरील आपल्या भक्तीकरता जाळून घेऊन आत्मबलिदान करतो; अशा जाळल्या जाण्यांतहि त्याची तक्रार कांहीच नसते. उलट त्यांतहि तो पराकाष्ठेचा आनंदच लुटतो.

तक्रारवादी कवि

याचे उलट तक्रारवादी किंवा विफलतावादी कवि सृष्टीच्या एकंदर आपत्ति, उत्पात, संकटें यांनी भांबावून जाऊन किंकर्तव्यमूढ होऊन केवळ रुदन वा आक्रोश करीत असतो. त्याला सर्वत्र घनांधःकार दिसतो. सृष्टीची 'उगीच'ता त्याला त्रासवीत असते. तो स्वतः आर्त बनून समाजालाहि आर्त बनवीत असतो.

मी वर चर्चिलेल्या दृष्टिकोनांतून संत कवींनी काव्यें लिहिलीं असतील असें मुळीच नाही! पण भक्तीमुळे तीं तशीं झालीं, एवढें मात्र खरें! जीवन हें 'उगीच'च नाही तर त्याला एक महान आशय आहे, व तो याच जीवनांत साधण्यासारखा आहे, हें संत कवींनी आपल्या काव्याने व कृतीने दाखवून दिलें. हें त्यांचें कार्य समाजास तेवढेसें उपकारक नाही, असें म्हणणें त्यांच्या काव्याविषयी व कार्याविषयी अज्ञान व्यक्त करणें होय!

संतकवींनी आपल्या काव्याकरता छंदहि बरेच लवचिक वापरले आहेत. त्यांत आरत्या, पदें व क्वचित् ठिकाणीं रागदारीसारखी ठेवण, याची इतकी विविधता आहे की, त्यावरून सुद्धा अनेक मुक्तछंद सदृश छंद सिद्ध होतात. या ठिकाणीं छंदाविषयी एकदोन मुद्दे विचारांत घेतल्यास अस्थानीं होणार नाही. अभंगादि अक्षर छंद हा जसा मराठींतील लगत्वभेदातीत अक्षर संख्याक पद्यप्रकार आहे, त्याप्रमाणे वैदिक छंद हाहि लगत्वभेदातीतच अक्षर संख्याक पद्यप्रकार आहे. त्यांत गायत्री (अक्षर संख्या २४) उष्णीक् (अ. सं. २८) अनुष्टुभ् (अ. सं. ३२) बृहती (अ. सं. ३६) पंक्ति (अ. स. ४०) त्रिष्टुभ् (अ. सं. ४४) जगति (अ. सं. ४८) अशा तऱ्हेने २ पासून ४८ पर्यंत अक्षर संख्याक छंदांचीं आवर्तनें उपयोगांत आणलेलीं आहेत. त्यांतहि प्रतिचरणीं आवर्तनें तितक्याच अक्षरांचीं येतात असें नाही; प्रसंगीं एकादें दुसरें अक्षर कमीहि असतें. 'चरण व्यूह भाष्य' (श्री. दासंभट्टजी अयाचित यांचे) हा ग्रंथ मुख्यतः वैदिक छंदासंबंधीच असून त्यांत अक्षर छंदांचे दोन पासून ४८ पर्यंत असे अनेक प्रकार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्णिले आहेत. ओवीसारख्या मराठी छंदांत तर पहिल्या तीन चरणांत प्रत्येकीं ६ ते १६ व चौथ्या चरणांत १३ अक्षरें (जास्तींत जास्त) येऊं शकतात. अशा तऱ्हेच्या मुक्तछंदाचे प्रयोग कमी अधिक प्रमाणांत पूर्वीच झालेले आहेत. आवर्तनाचें बंधन ओवी छंदांत शिथिल असल्यामुळे पूर्वीपासूनच खराखुरा मुक्तछंद मराठींत कित्येक वर्षे अगोदर अस्तित्वांत आहे. वैदिक काळापासून असे अक्षरछंदाचे छंदप्रकार असल्यामुळे व मराठींतहि ते असल्यामुळे श्री. आ. रा. देशपांडे यांच्या मुक्तछंदांत बिलकुलच कांही नवीन नाही असें वाटतें. त्यांतूनहि डॉ. माधवराव पटवर्धन यांनी 'एकत्र गुंफून। जीवित धागे'—हा पांच सहा अक्षरी अक्षर संख्याक छंद मराठींत पूर्वीच रूढ केला. एका भाषेंतून एकादी कल्पना उचलून स्वतःच्या भाषेंत आणली, तरी तो नवीन प्रयोग म्हणून समजण्याचा परिपाठ आहे. पूर्णतया नवीन असें वाङ्मयांत साधारणतः कोणीच आणूं शकत नाही. पण मराठींतीलच संत काव्यांत वगैरे वर दर्शविल्याप्रमाणे असे अक्षरसंख्याक छंदाचे प्रकार पुष्कळ असल्यामुळे वरील आजच्या प्रमुख मराठी ५–६ अक्षरांच्या छंदांत नवीन असें कांही नाही. यांत श्री. आ. रा. देशपांडे यांचें कार्य मी कमी मानतों, असें नाही; कारण वरील छंदांत कांही किरकोळ सुधारणा केल्यानंतर श्री. देशपांडे यांनी जो मराठी मुक्त छंद अस्तित्वांत आणला, त्यानंतर मराठी भाषेत त्या छंदात उदंड काव्यरचना झाली, हें त्यांना मिळालेलें श्रेयहि कांही कमी नाही. त्यांच्या छंदाचें आवर्तन ज्या अर्थी कायम आहे, त्या अर्थी हा छंद 'ओवी' छंदाच्याहि प्रतिगामी आहे असें मात्र वाटल्याशिवाय राहत नाही. श्री. देशपांडे यांच्या छंदाबद्दल प्रांजलपणें मला तसें वाटतें, म्हणूनच लिहिलें आहे.

श्री. वा. ना. देशपांडे यांनी आपल्या कोरकू काव्यांत 'मुक्त ओवी' हा जो एक छंदाचा प्रयोग केला आहे, त्यांत त्यांनी मूळच्याच ओवी छंदावरून 'मुक्त ओवी' हा छंद सिद्ध केला आहे. तो एका अर्थाने त्यांनीच म्हटल्याप्रमाणे 'मराठीचा प्रयोगावस्थेंतील खराखुरा मुक्तछंद अगर प्रचलित मुक्त छंदाची पुढची पायरी' आहे असें म्हणतां येईल. कारण श्री देशपांडें यांनीच पहिल्याप्रथम ओवी छंदांतील आवर्तन कमी जास्त अक्षरांचें असतें असें, स्पष्ट केलेलें आहे.

डॉ. ना. ग. जोशी यांनी 'मुक्त शैली' छंद (सुमारें दोन वर्षांपूर्वी) पहिल्याने शोधून काढला असें म्हटलें आहे. तें बरोबर नाही. अशा तऱ्हेचे लयप्रधान मुक्त छंद मी सुमारे दहा वर्षांपूर्वीपासून वापरीत आहें व तशा छंदांत कांही काव्यें वेळोवेळीं निरनिराळ्या मासिकांत प्रकाशितहि झालेलीं आहेत. एवढेंच नव्हे तर अक्षरांचें आवर्तन तोडलेले, व भावनांची उत्कटता दाखविणारे असे लयतत्वास अनुसरून कित्येक छंद, जाणूनबुजून वा नकळत माझ्या पूर्वीच्या काव्यांत व या लेखांकांत उल्लेखिलेल्या दोन दीर्घ काव्यांतहि येऊन गेलेले आहेत. या संबंधीं श्री. रावबा बल्लाळ यांच्या, माझ्याविषयींच्या छोट्या परिचयात्मक लेखांतील (सुषमा, आक्टोबर १९५५) एक दोन लहान अवतरणें उद्धृत करतों "श्री. हूड यांनी आपला स्वतंत्र मुक्त छंद निर्माण केला आहे"······"श्री. हूड यांनी मुक्त शैलीच्या धर्तीची रचना फार पूर्वीपासून केलेली आहे. तिच्याबद्दल ते बडोद्याचे कवि डॉ. ना. ग. जोशी अगर अन्य कुणीही यांचे बिलकूल ऋणी नाहीत."

सर्वतोपरीने मुक्त अशी छंदासंबंधी मला अनेक सूचना करावयाच्या आहेत. त्या सुचविण्याचें हें स्थल नव्हे. तरीपण लगत्वभेदातीत छंदांत ऱ्हस्व अक्षर जसें दीर्घ समजण्यांत येतें, तसें दीर्घ अक्षर ऱ्हस्व समजण्यांत कां येऊं नये ? तसें झाल्यास इतर सोयीप्रमाणे आवर्तनासंबंधीचीहि खळखळ मिटण्यास बरीच मदत होईल.

माझ्या उपरोक्त दोन काव्यांत व प्रस्तुत तीन लेखांकांत, मी कांही अगदी नवीन मतें व सिद्धांत मांडल्यामुळे अनेक प्रश्न व उपप्रश्न निर्माण होतात. ते मी वरील दोन काव्यांत विस्तृतपणे विशद केलेले आहेत. या तीन लेखांकांतील राहिलेल्या, 'भक्ति उत्पन्न होण्याची प्रक्रिया कोणती', 'काव्याच्या योग्य व्याख्येबद्दल विचार'; 'भृंगसिद्धांताच्या पुष्टीकरणार्थ अनेक आधार' 'कर्मवादाचा सिद्धांत लंगडा, तर त्या ठिकाणी दुसरा कोणता सिद्धांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

योग्य', 'conviction not based on reason', चें स्वरूप व कार्य इ. अनेक प्रश्नांबरोबरच, 'विदर्भस्थ संतकवींचे दोष;' 'विदर्भांतील लोकवाङ्मयासंबंधी चर्चा' इ. मुद्यांचा विचार पुढे केव्हा. तरी निरनिराळ्या लेखांत सवडीनुसार करीन. प्राचीन विदर्भाच्या काव्याचें विवेचन मी माझ्या दृष्टिकोनांतून करण्याचें ठरविलेलें असल्यामुळे, व वरील दोनहि दीर्घकाव्यांवर संस्करण वगैरे होऊन, तीं पूर्ण होण्याकरता व प्रकाशित होण्याकरता बराच कालावधी लागणार असल्यामुळे, माझ्या काव्याबद्दलचा उल्लेख मला या लेखांत करावा लागला. या औचित्यभंगाबद्दल मी वाचकांची क्षमा मागतों व 'Fools rush in where angels fear to tread' या वचनाची मला आठवण आहे, एवढेंच लिहून ही लेखमाला पुरी करतों.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.

जाहिराती स्वीकारल्या जातात

मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

साभार स्वीकार

भिल्लवीर कालिंग—ले. गो. नी. दांडेकर, महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती.

बाल सन्मित्र—(पाक्षिक) मालवण; कै. पा. ना. मिसाळ स्मृति अंक (१५-६-५६)

ललितकलेच्या सहवासांत—ले. पु. श्री. काळे.

स्वामिनी—(नाटक) ले. पु. भा. भावे.

मन्दोर्मिमाला—(संस्कृत काव्य) ले. श्री. भा. वर्णेकर.

लेखकांस प्रार्थना

(१) युगवाणीसाठी पाठवावयाचा लेख अभ्यासपूर्ण, वजनदार, उपयुक्त, मौलिक, तरीहि यावच्छक्य सुलभ, असा असावा. लेखकापेक्षाहि लेखाचें महत्त्व 'युगवाणी'स विशेष आहे. लेख कागदाच्या एकाच बाजूस, समास सोडून, टपोऱ्या अक्षरांत लिहिलेला असावा. शुद्धलेखन नवें असावें.

(२) लेख आम्हांला मिळतांच तीन आठवड्यांत त्याचा निर्णय लेखकांस कळविण्यांत येईल. स्वीकृत झालेला लेख आम्हांस न कळवितां अन्यत्र प्रसिद्धीसाठी पाठवूं नये.

(३) पुरेसें पोस्टेज सोबत असेल तरच अस्वीकृत लेख लेखकांकडे परत पाठविण्यांत येईल. एरव्ही सुमारें एक महिन्यानंतर तो निकालांत काढण्यांत येईल.

(४) उत्कृष्ट ललित साहित्यहि प्रसंगोपात्त अत्यल्प प्रमाणांत प्रसिद्ध करण्यांत येईल.

(५) चालू वर्षी कोणीहि कविता पाठवूं नये. पाठविल्यास त्यांची दखल घेतली जाणार नाही.

/—संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक-परामर्श

दासोपंतांची पासोडी

संपादक : न शो. पोहनेरकर, मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन, मूल्य ८ रुपये.

मराठवाडा साहित्य परिषद ही महाराष्ट्रांतील एक अग्रगण्य वाङ्मय संस्था असून तिने अल्पकाळांत फार मोठी आघाडी मारली आहे. मराठी सारस्वताचे आद्य निर्मिते त्याच प्राचीन विदर्भात निर्माण झाले असून त्यांचे प्राचीन बहुमोल ग्रंथ उजेडांत आणण्याचें महत्त्वाचें कार्य ही संस्था करीत असते. 'दासोपंताची पासोडी' हा अशाच महत्त्वाच्या ग्रंथांपैकी एक होय.

दासोपंत हे पंधराव्या शतकांत होऊन गेले. त्यांचा गीतार्णव–पदार्णवादि ग्रंथसंभार एखाद्या अर्णवासारखाच विशाल आहे. दासोपंत मराठीचे एकांतिक अभिमानी म्हणून ओळखले जातात. पण ते संस्कृत पंडितहि होते हें अनेकांना माहीत नसते. या महापंडिताने वेदान्त विषयावर पुष्कळच लिहिलें आहे. त्यांतच पंचीकरण हा जो वेदांतातला सर्वपरिचित विषय त्यावर त्यांनी जें लिखाण केलें तें साध्या कागदावर न करता कापडाच्या पासोडीवर केलें आहे; व एखाद्या नकाशाप्रमाणे ही पासोडी आजतागायत त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी सांभाळून ठेवली आहे. शेकडों वर्षांच्या कालावधीमुळे या पासोडीची मधून मधून पडझडहि झाली आहे. ही पासोडी निदान नकलेच्या स्वरूपांत तरी शिल्लक असावी म्हणून शके १८६१ मध्ये त्यावरून दुसऱ्या पासोडीवर तशीच तंतोतंत दुसरी प्रत करण्यांत आली व तीहि आज सुस्थितींत आहे. या मजकुरांत नुसत्या ओव्याच नाहींत, तर आकृत्या, कोष्टकें हेंहि आहेत व तें दासोपंतांनी स्वहस्तें तयार केलें आहे. ही पासोडी चार फूट रुंद व चाळीस फूट लांब अशी आहे.

प्रस्तुत ग्रंथ हा या हस्तलिखित पासोडीचा मुद्रित अवतार आहे व तोहि ओळीस ओळ असाच छापला आहे. प्रत्येक प्रकरणाची लांबी, रुंदी, ओळी हाहि मजकूर प्रारंभीं आलेला आहे. ग्रंथाच्या प्रारंभीं दासोपंतांचें चरित्र व वाङ्मय यासंबंधी संपादकांनी विवेचक प्रस्तावना जोडली असून पासोडीच्या स्वरूपाचेंहि पूर्ण वर्णन केलें आहे. ही प्रस्तावना अत्यंत रेखीव आणि निर्दोष अशी आहे. दासोपंतांचें हस्ताक्षर पासोडीचें आंबेजोगाई येथील निवासस्थान, पासोडीचें निरीक्षण करीत असतांना राष्ट्रपति अशी चित्रें आंत दिल्यामुळे ग्रंथाला शोभा आली आहे. निरनिराळ्या आकृत्या व कोष्टकें याचे मोठमोठे आराखडे सोबत जोडले आहेत.

दासोपंताच्या पंचीकरण ग्रंथाचें अंत:परीक्षण करणें हा माझ्या लिहिण्याचा हेतु नाही; तर मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्याचा गौरव करणें हा हेतु आहे तसें पाहिलें तर प्रस्तुत ग्रंथ सामान्य वाचकास फार दुर्बोध व स्वत:च्या आवाक्यापलिकडे वाटणारा आहे. पण मराठी भाषा किती प्रौढ विचार पेलण्यासाठी कित्येक शतकांपूर्वीहि समर्थ होती हें जाणून घेण्यासाठी तरी मराठीच्या अभ्यासकाने अशा ग्रंथाचें अवलोकन केलें पाहिजे. या ग्रंथाचें प्रकाशन राष्ट्रपतींच्या हस्तें झालें हा मोठाच सुयोग आहे.

मराठींतील एक सुप्रसिद्ध व अद्भुत ग्रंथ मोठ्या कष्टाने प्रकाशित केल्याबद्दल संपादक श्री. पोहनेरकर व मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. रा. ब. माढेकर यांचें आम्ही अभिनंदन करतों.

संत कवि दासगणू महाराज

व्यक्ति आणि वाङ्मय ले०––अ. दा. आठवले; प्रस्तावना ह. भ. प. शं. वा. दांडेकर; पुरस्कार म. म. द. वा. पोतदार. पृ. ३८ + ४०८ + १७६ मूल्य ७॥ रु.

मराठवाड्यांतील संतकवि दासगणू महाराज हे विस्तृत काव्यलेखन करणाऱ्या विद्यमान मराठी कवींमध्ये अग्रगण्य आहेत. त्यांचें हें विस्तृत चरित्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यांचे अंतेवासी श्री. अ. दा. आठवले यांनी लिहून सादर केलें आहे. यांतील पहिला भाग हा दासगणूंच्या चरित्रविषयक असून दुसरा भाग वाङ्मयपरिचयात्मक आहे. चरित्रविषयक पहिल्या भागांत, चरित्रनायकाच्या प्रतिभेचा विकास कसकसा होत गेला व ते साध्यावस्थेंतून सिद्धावस्थेंत कसकसे प्रगत झाले याचें वर्णन आहे. श्री. दासगणू पूर्वायुष्यांत साधे पोलीस कान्स्टेबल होते हें त्यांच्या उत्तरायुष्यावरून कोणाला खरेंहि वाटणार नाही. मात्र त्यांच्या चरित्रांत फारसें असामान्य असें कांही नाही, म्हणून आम्हास या ग्रंथाच्या प्रथम विभागापेक्षा दुसरा वाङ्मयविवेचनाचा विभाग जास्त महत्त्वाचा वाटतो. कारण दासगणूंचें स्वत्व कोणालाहि व केव्हाहि पाहावयाचें असेल तर त्याला तें त्यांच्या वाङ्मयांतच सापडेल.

कांही शतकांपूर्वी दासोपंतांनी मराठींत वाङ्मयाचाहि अर्णव उत्पन्न केला. त्यानंतर इतका लेखनविस्तार करणारा अन्य कोणी निघाला नाही. दासगणूंच त्यांच्याशीं अंशतः तुल्यबल ठरूं शकतील. तसेंच नाभाजी व महिपती यानंतर संतचरित्रांचा इतका काव्यात्मक परामर्श दासगणूंशिवाय दुसऱ्या कोणीहि घेतला नाही. चरित्र लेखकांनी चरित्रनायकाच्या लिखाणाची ओवीसंख्या व पंक्तिसंख्या यांची कलमवार यादीच दिली आहे, ती पाहण्यासारखी आहे.

दासगणूंच्या लिहिण्यांत प्रेमळपणा, भक्ति, संतांविषयी श्रद्धा इत्यादि गुण ओतप्रोत भरले आहेत. मात्र हीं सर्व संतचरित्रें विवेचक बुद्धीने लिहिलेलीं नाहीत त्यामुळे तीं एकांगी झालीं आहेत. किंबहुना भाविकता व एकांगीपणा हे बरोबरच असतात असें म्हटलें तरी चालेल. दासगणूंची रचना सफाईदार व धावती आहे. मराठींतील ओवी हा छंद मानला तर मुक्त, व मानला तर बद्ध असा उभयविध आहे. त्यामुळे त्यांत भराभर रचना करणें सापेक्षतः सोपें जातें. ग्रंथाच्या शेवटीं दासगणूंच्या वाङ्मयांतील बरीचशीं वचनें उध्दृत केलीं आहेत. त्यामुळे चरित्रनायकाच्या वाङ्मयाचें साक्षात् दर्शन घडतें. आज ही संतचरित्रलेखनपद्धति जुनी किंवा कांहींच्या मतें टाकाऊ ठरण्याचा संभव आहे. पण त्या वाङ्मयप्रकारालाहि स्वतंत्र स्थान कायमचें राहणार आहे असें आम्हास वाटतें.

प्रस्तावना व पुरस्कार दोन्हीहि उत्कृष्ट आहेत. भाविक मंडळींनी हा ग्रंथ अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे.

पां. कृ. सा.

आलोक

लेखक : प्रा. भगवंत देशमुख, प्रकाशक : रंगनाथ माधव जोशी, ध्रुव प्रकाशन, साधना संघ, गौळीगुडा, हैद्राबाद द. किंमत दोन रुपये.

प्रा. भगवंत देशमुख यांच्या १५ ललितनिवंधांचा हा संग्रह आहे. ललितनिबंध हा वाङ्मयप्रकार हाताळायला सोपा पण यश मिळविण्याला कठिण असा प्रकार आहे. म्हणूनच प्रारंभीं अनेक तरुण होतकरू लेखक हा प्रकार हाताळतात पण त्यांतून 'सिद्धि' मिळविणारे असे फारच थोडे शिल्लक राहिलेले दिसतात. 'आस्थेचां महापुरीं। रिघताती कोटिवरी। परी प्राप्तीच्या पैलतीरीं। विपाइला निगे' हें थोड्या फार प्रमाणांत ललितनिबंधाच्या बाबतींतहि खरें आहे. प्रस्तुत संग्रहांतील निबंध वाचून, विशेषतः त्यांतील 'दारापुढे', 'उंटाच्या वाह्या', 'उपेक्षित वक्ते', 'माझंच चुकलं', 'निशाभ्रमण', 'तयार कपडे' हे निबंध वाचून प्रा. देशमुखांनी 'प्राप्तीचा पैलतीर' गाठला आहे असें म्हणण्याला हरकत वाटत नाही.

आरंभी 'गुजगोष्ट' नंतर 'लघुनिबंध' व अलिकडे 'ललित निबंध' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या या प्रकाराला कांही तंत्र नाही असें वाटतें. तें वाटणें खरें असलें तरी त्यांतील अर्थ खरा नाही. ललितनिबंधाचेंहि तंत्र आहे व तें साधणें बरेंच कठिण आहे. या तंत्राचे कांही ठळक नियम, या प्रकाराला जीं तीन नांवें वेळोवेळीं मिळालीं म्हणून सांगितलीं त्या नांवांत सूचित झाले आहेत. शैलींतील व वृत्तींतील (लेखकाच्या) खेळकरपणा तसेंच मित्राशीं सहज गप्पागोष्टी करण्याची भूमिका या गोष्टी 'गुजगोष्ट' या नांवातून सूचित होतात तर त्याचा अल्पविस्तार 'लघुनिबंध या नांवानें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सूचित होतो. तसेंच हा लालित्यप्रधान प्रकार आहे हें ललितनिबंध या नांवावरून लक्षांत घेण्यासारखें आहे.

प्रस्तुत संग्रहांतील 'दारापुढे', 'उंटाच्या बाह्या', 'माझंच चुकलं' इ. निबंधांत वृत्तीचा व शैलीचा खेळकरपणा चांगला प्रत्ययाला येतो. लालित्यहि या आणि 'माझें निशाभ्रमण', 'उपेक्षित वक्ते', 'हा तर गोदा कांठ' इ. निबंधांत पुरेसें आहे. एखाद दुसरा निबंध सोडला (उदा. 'जिंदाबाद', 'आंधळा तूं नाहीस') तर सारेच निबंध 'लघु' आहेत.

'साध्या विषयांत मोठा आशय' पाहणें हाहि ललित निबंधाचा एक विशेष म्हणतां येईल. तसा तो प्रा. देशमुखांनी 'तयार कपडे', 'उंटाच्या बाह्या' 'माझंच चुकलं' इ. निबंधांत पाहिलेला आहे. 'जीवनाच्या वेगवेगळ्या भागांत, वेगवेगळे सांचे तयार होतात नि कोणत्या ना कोणत्या तरी सांच्यांत बसण्यासाठी लोक धडपडूं लागतात,' 'तयार कपड्या'वरून देशमुखांना सुचलेला हा आशय पहा किंवा 'उंटाच्या बाह्या' या वरून सुचलेला, 'सौंदर्य, मग तें जेथे असेल तेथून घ्यायला काय हरकत आहे ? जीवनांतील कणाकणांतून विखुरलेलें सौंदर्य वेचून घेणें हीच खरी सौंदर्यदृष्टि. कसल्याहि बाबतींत केवळ ठरीव संकेतांच्या ठोकळेबाज कल्पना उराशीं कवटाळण्यांत स्वारस्य तें कसलें ? ' हा आशय पहा. ते जसे मोठे आहेत तसेंच मार्मिकहि आहेत.

लेखकाचा व्यासंग व बहुश्रुतपणा ललितनिबंधांतून सहजगत्या जर व्यक्त झालेला असेल तर तो निबंधांच्या वाचनीयतेंत व रोचकतेंत भर घातल्याशिवाय राहात नाही. मराठी, संस्कृत, उर्दू व इंग्रजी वाङ्मयांतील सुप्रसिद्ध पंक्तींचा व उक्तींचा वापर देशमुखांनी चांगल्या रीतीने केला आहे त्यामुळे निबंधांना एक 'दर्जा' प्राप्त झाला आहे.

ललित निबंध हा विचारप्रधान व तर्कनिष्ठ प्रकार नव्हे. एखादा मुद्दा तर्काच्या जोरावर सिद्ध करण्याचा प्रयत्न या प्रकाराला मानवत नाही. 'मांजराच्या मिशा', 'कुठं तरी चुकलंय', 'बिचारा शेख महंमद' या निबंधांतील आशयाची मांडणी पुष्कळ अंशाने तर्कनिष्ठतेकडे झुकल्यासारखी वाटते म्हणूनच ते वाचतांना 'निबंध' वाचीत असल्याचा भास मधून मधून होतो. या तर्कनिष्ठतेप्रमाणेंच एखाद दुसरा निबंध पुनरुक्तिमुळे रुक्ष व कंटाळवाणा झालेलाहि दिसतो. परंतु अपवादात्मक असे हे प्रकार सोडले तर वर दाखविल्याप्रमाणे अनेक वैशिष्ट्यांनी व गुणांनी हे निबंध युक्त आहेत व म्हणूनच आरंभीं प्रा. देशमुखांना 'प्राप्तीच्या पैलतीराला पोचलेले' असें मी म्हटलें.

प्रस्तुत संग्रहाचें नांवहि ललित निबंधाचें आणखी एक वैशिष्ट्य सुचविणारें म्हणून मार्मिक आहे. लेखकाच्या दृष्टींतून जगाचें दर्शन व शैलींतून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचें दर्शन हें तें वैशिष्ट्य होय. प्रस्तुत संग्रहांतील निबंधांतून दोन्ही प्रकारचा 'आलोक' घडतो म्हणून हें नांव समर्पक वाटतें.

शेवटीं प्रा. देशमुख यांचें मनःपूर्वक अभिनंदन करून प्रस्तुत निबंधांचा आस्वाद घेण्याची रसिकांना मी सूचना करतों.

समाजांत नटाची जागा

लेखक राम गणेश गडकरी; प्रकाशक : श्री. हिमांशु कुमार भागवत, सहकार प्रकाशन, ३१५, सदाशिव, पुणें २. मूल्य २॥ रु.

कै. राम गणेश गडकरी यांनी सुमारें ५० वर्षांपूर्वी लिहिलेल्या तीन निबंधांचा हा संग्रह श्री. वसंत शांताराम देसाई यांच्या पुरस्कारासह श्री. हिमांशुकुमार भागवत यांनी चालू वर्षाच्या आरंभीं प्रकाशित केला आहे. प्रस्तुत निबंधांच्यामुळे गडकऱ्यांच्या अमाप कीर्तींत नवी भर पडणार आहे असांतला भाग नाही. उलट गडकऱ्यांच्या कीर्तीमुळेच या निबंधांना कांही महत्त्व आलें आहे असें म्हणणेंच योग्य होईल.

या संग्रहांतील तीन निबंधांपैकी एकाला निबंध म्हणतां येणारच नाही. एका बक्षिसाच्या निमित्तानें श्री. कृ. कोल्हटकरांच्या नाटकांतील कांही सुंदर उतारे थोड्याशा टीकाटिप्पणीसह गडकऱ्यांनी त्यांत सादर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केले आहेत. 'सुन्दर उतारे' असेंच त्याचें नांव आहे. दुसरा निबंध 'नाट्यकलेची उत्पत्ति' या नांवाचा असून त्यांत 'नाट्यकलेच्या उत्पत्तीचें विवेचन करीत असतां मनांत येणारे विचार' गडकऱ्यांनी नमूद केले आहेत. 'ते निव्वळ तर्क आहेत' व ते खरेच आहेत असें म्हणण्याचा खुद्द गडकऱ्यांचाच आग्रह नाही.

यांतील तिसरा, 'समाजांत नटाची जागा' हा पुस्तकाच्या नामाभिधानाला पात्र ठरलेला निबंध मात्र बराच महत्त्वाचा आहे. नटाचें कार्य कोणतें, तें महत्त्वाचें कसें आहे, तत्कालीन नटांचा दर्जा कसा खालावलेला आहे व तो कसा सुधारतां येईल यासंबंधी प्रस्तुत लेखांत विस्ताराने विवेचन आलेलें असून त्यांतील बराचसा भाग आजहि मननीय आहे, विशेषत: नटाला सुधारण्याची जबाबदारी स्वत: नटाप्रमाणेच नाटककार, अभिनयशिक्षक (हाच आजचा दिग्दर्शक) व मार्मिक प्रेक्षक या त्रिवर्गावर असल्याचें जें गडकऱ्यांनी सांगितलें आहे तें कोणालाहि मान्य व्हावें असेंच आहे. नटाच्या शिक्षण व अभिनय यांच्या प्रमाणेच नैतिक दर्जासंबंधीहि सुधारणेची जी आवश्यकता गडकऱ्यांनी प्रतिपादिली आहे ती लक्षांत घेण्यासारखी आहे.

प्रस्तुत लेखांत अनेक ठिकाणीं गडकऱ्यांची मार्मिकता दिसून येते. हें एकच उदाहरण पहा. गडकरी लिहितात, "मार्मिक प्रेक्षकांत हल्ली अनास्थेखेरीज आणखी एक दोष दिसून येतो. तो म्हणजे लांच खाणें हा होय ! कांही नाटकवाले गांवांतील समजूतदार लोकांना सन्मानाने बोलावून आणून खड्डयांतील खुर्च्यांवर बसवितात. सकृद्दर्शनीं ही गोष्ट बरीशी दिसते; पण अशा रीतीने त्या प्रेक्षकांबरोबर त्यांची मार्मिकताहि खड्डयांतच पडते." [गडकऱ्यांच्या कोटिबाजपणाचीहि थोडीशी चमक येथे दिसते.]

गडकऱ्यांचें ५० वर्षांपूर्वीचें गंभीर विवेचनात्मक गद्य नव्याने प्रस्तुत संग्रहाच्या रूपाने वाचकांच्यापुढे आलें आहे. आरंभींच म्हटल्याप्रमाणे गडकऱ्यांच्या कीर्तींत भर घालणारें तें नसलें तरी गडकऱ्यांच्या चाहत्यांच्या दृष्टीने त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे.

लोकांचा राजा

लेखक : चिं. य. मराठे; प्र : मराठी प्रकाशन, १२ त्रिभुवन रोड, मुंबई ४; मूल्य—दोन रुपये.

हें एक चारअंकी नाटक असून म्हटलें तर ऐतिहासिक, म्हटलें तर काल्पनिक असें त्याचें स्वरूप आहे. इ. स. १८८१-८२ सालीं कोल्हापूरचे राजे शिवाजी महाराज यांच्या बाबतींत जें प्रकरण झालें व ज्याची झळ केसरी-मराठाकारांना पोचून लो. टिळक व श्री. आगरकर यांना तुरुंगवास पत्करावा लागला त्या 'करवीर' प्रकरणावर व त्याच्याशीं संबंधित राजे शिवाजी यांच्या आयुष्यावर हें नाटक आधारलेलें आहे. परंतु या एकंदर प्रकरणाच्या बाबतींत सरकारी बाजू व लोकांची बाजू अशा दोन बाजू असल्यामुळे त्यांतील कोणत्या बाजूवर तें आधारावें याचा नाटककाराला प्रश्न पडला. प्रस्तावनेंत नाटककाराने लिहिलें आहे— "...आधाराला सरकारी बाजू घ्यावी तर तो नाटकाच्या दृष्टीने अगदींच मिळमिळीत. बरें, लोकसमजुतीची घ्यावी तर ती अतिरंजित आणि ती देखील कोर्ट कचेरींत पक्की नाशाबीत झालेली. अशा स्थितींत मला सारा डोलारा काल्पनिक उभारावा लागला. मात्र सारी हकीकत वाचून मनांत उरलेला सांखा या डोलाऱ्याला अस्तरादाखल उपयोगी पडला, हें येथे नमूद केलें पाहिजे."

ऐतिहासिक नाटकांत ऐतिहासिक सत्य असावें कितपत याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. तें असावें हें उघड आहे. मात्र या नाटकांतील कथानक ज्या प्रकरणावर आधारलेलें आहे त्या प्रकरणाच्या बाबतींत ऐतिहासिक सत्य कोणतें हेंच ठरविणें मोठें कठिण आहे हें मान्य करावें लागेल. अशा परिस्थितींत लेखकाने पत्करलेला मार्ग अपरिहार्यच म्हणावा लागेल. तथापि लोकसमजुतीच्याच बाजूने लेखकाने आपला कौल दिला आहे व तेंहि स्वाभाविकच आहे.

लेखकानेच म्हटल्याप्रमाणे स्वत: शिवाजी महाराज, ग्रीन व रामभट हींच काय तीं ऐतिहासिक पात्रें, पण त्यांतहि काल्पनिक रंग पुष्कळच भरलेला

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असून त्यांनाहि काल्पनिक पात्रें मानण्यास लेखकाची हरकत नाही. नाटकांतील घटना व प्रसंगहि काल्पनिकच रंगविले आहेत.

शिवाजी महाराज दत्तकपुत्र. सत्ता इंग्रज एजंटाच्या हातीं. ती महाराजांच्या हातीं देऊं नये ही इंग्रजांची इच्छा. कारभारी बापूसाहेबाला हातीं धरून सरकारने आपला कार्यभाग साधण्याला सुरवात केली. राजाला वेडा, व्यसनी इ. ठरवून अधिकारग्रहणाला नालायक ठरविण्याचा एकंदर बनाव. तो सिद्धीला जाण्याच्या आंतच नाटककाराने नाटकाचा शेवट घडविला आहे. परंतु पुढील भवितव्याची कल्पना येतेच. त्या दृष्टीने शेवट करुणच म्हटला पाहिजे. एकंदरीने नाटकांतील राजाची स्थिति दयनीय व करुणाजनकच आहे व ती चित्रित करण्यांत नाटककाराला यश मिळालें आहे. मात्र त्यांतील 'लोकांचा राजा' हा प्रकार मात्र ओढाताणीचा व कृत्रिम वाटतो.

राजाचें चित्र दयनीय तर राणीचें विलोभनीय. दोन्हीहि उठावदार आहेत. इतर स्वभावचित्रेंहि सामान्यतः चांगलीं रेखाटलीं आहेत. संवाद क्वचित् कृत्रिम वाटतात. कांही ठिकाणीं अनुप्रासहि साधले आहेत. परंतु एकंदरीने हेंहि अंग चांगलें साधलें आहे. लहान्या बारक्याची राजाशीं सलगी असंभवनीय वाटते. तिसऱ्या अंकांतील राजा-राणीच्या द्वंद्वगायनाचा प्रसंगहि स्वाभाविक वाटत नाही. तिसऱ्याच अंकांतील राजा व फुलाई यांचा प्रसंगहि अतिरंजित वाटतो. यासारखे कांही दोष नाटकांत असले तरी इंग्रजांच्या मुळे एका संस्थानिक-तोहि शिवाजी महाराजांच्या वंशांतला-राजाची झालेली दयनीय अवस्था चांगल्या रीतीने प्रत्ययाला आणून देण्यांत नाटककाराला यश आलें आहे, असें म्हणायला हरकत नाही.

—श्री. मा. कु.

प्रांतरचना व महाराष्ट्र

लेखक व प्रकाशक—वा. द. रानडे ३३ एरंडवणा, पुणें ४. पृष्ठें १३२. मूल्य १॥ रुपया.

राज्यपुनर्रचनेचा प्रश्न हा आजचा सर्वांत महत्वाचा प्रश्न बनला आहे. प्रथम किंवा द्वितीय पंचवार्षिक योजनेला जास्त महत्त्व आहे, कसें कितीहि सांगितलें तरी लोक तें मान्य करायला तयार नाहीत. लोकांना अतिशय महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नावर श्री. वा. दा. रानडे यांनी हें छोटेसें पण मार्मिक व उपयुक्त पुस्तक लिहिलें आहे. पुस्तकाला म. म. दत्तो वामन पोतदार यांची विवेचक प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेमुळे पुस्तकाच्या मूल्यांत भर पडली आहे.

श्री. रानडे यांनी प्रांतांच्या पुनर्रचनेसंबंधीं आधी तात्त्विक विवेचन केलें आहे, व आताच भाषावार प्रांतरचना करणें कां आवश्यक आहे हें तर्कशुद्ध रीतीने पटवून दिलें आहे. म. म. पोतदार आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात त्याप्रमाणे हा प्रश्न घटनापरिषदेनेच सोडवावयास हवा होता. तो यापुढे तरी टाळणें इष्ट नाही, व शक्यहि नाही. भाषिक पुनरचना म्हणजे भारताचें भाषिक विभाजन नव्हे, हें श्री. रानडे यांनी स्पष्टपणाने दाखवून दिलें आहे.

प्रारंभींच्या तात्त्विक चर्चेनंतर रा. पु. समितीनें सुचविलेल्या सर्व राज्यांसंबंधीं साधक बाधक विवेचन श्री. रानडे यांनी केलें आहे. हें विवेचनहि उपयुक्त ठरेल असेंच आहे. मुंबई व महाराष्ट्र यांच्यासंबंधी साहजिकच अधिक सविस्तर विवेचन करण्यांत आलें आहे.

पुस्तकाच्या शेवटी 'भाषावर प्रांतांची वाटचाल' म्हणून या चळवळींतील महत्त्वाच्या तारखा देण्यांत आल्या आहेत, त्यांचा वाचकांना फार उपयोग होण्यासारखा आहे. शेवटच्या पानावर भावी भारताचा नकाशाहि देण्यांत आला आहे.

म. म. पोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे लेखकाचा कल कांही ठिकाणीं रशिया व चीनकडे झुकलेला दिसतो. लेखकांच्या तत्संबंधी मतांशीं आम्ही सहमत होऊं शकत नाही.

असें कांही न पटण्यासारखे तुरळक भाग वगळल्यास श्री. रानड्यांच्या प्रतिपादनाशीं सहमत व्हावयास कांहीच प्रत्यवाय नाही. मराठींत अशा प्रकारचें लिखाण अगदी योग्य त्या वेळीं प्रकाशित करण्याची समयसूचकता श्री. रानडे यांनी दाखविल्यामुळे त्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे.

—गो. मा. कु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रूपकथ्थक

प्रकाशक : सौ. सरिता रेगे, 'कलापद', माणिक हाऊस, खंबाला हिल, मुंबई २६.

रूपकथ्थक या नांवाखाली या संग्रहांत अंतर्भूत असलेल्या कांही गोष्टी पूर्वीच कांही नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या, तेव्हाच त्यांतील वेगळेपण माझ्या प्रत्ययास आलें होतें. संग्रहाच्या स्वरूपांत वाचून अर्थातच तो वेगळेपणा विशेषच जाणवला ! हा कथासंग्रह असला तरी रूढ अर्थानें ज्याला आपण कथा म्हणतों, तसें यांत कांहीहि नाही. केवळ कांही प्रसंगचित्रें''क्षणचित्रें सुबोध व डौलदार भाषेंतून गुंफलीं आहेत. या साऱ्याच कथा स्त्रीवर (अधिक स्पष्ट सांगायचें तर, युवतींवर) आधारलेल्या आहेत; आणि या साऱ्या स्त्रिया नित्याच्या वाङ्मयांतून आढळणाऱ्या स्त्रियांहून सर्वस्वी वेगळ्या आहेत. या स्त्रियांच्या स्वभावांतील एकेक पैलू लेखकानें अशा कौशल्यानें स्पष्ट केला आहे की त्या स्त्रियांचें संपूर्ण व्यक्तिमत्व ठळकपणें वाचकांच्या दृष्टीसमोर उभें रहावें ! या दृष्टीनें 'देहस्विनी', 'अनुराधा', 'अमित्रा', 'मनू', 'पल्लवी', या विशेष यशस्वी वाटतात.

कथांच्या रोचकतेंत कथालेखनाच्या भाषेनेंहि बराच हातभार लावलेला आहे, हें नाकबूल करतां येणार नाही. किंबहुना वाचक कथा वाचतांच स्वतःला विसरून वेगळ्याच जगांत विहार करीत असल्याचा जो गूढ अनुभव घेतो त्याचें श्रेय बहुतांशीं या भाषेलाच द्यावें लागेल. 'भर उन्हाळयाच्या दिवसांत दुपारीं लाल पालवीनं फुटलेला पिंपळ सळसळावा तशी ती दिसली' (पृ. १९) अशा तऱ्हेचीं वाक्यें संपूर्ण पुस्तकांत जागोजागीं आढळतील. मात्र अशा सूत्रमय'''लयबद्ध भाषेंत 'नीवीविमोचाच्या वेळीं वस्त्रमूल्याचं विचिंतन करणारा अरसिकहि बहुधा याच जातीचा असावा' (पृ. ४०) यासारखें एखादें वाक्य रसापकर्षक वाटतें.

एकंदरींत सूचक प्रारंभ व शेवट आणि रचनेंतील कलात्मक रेखीवपणा यामुळे या साऱ्या कथा पुनःपुन्हा वाचण्याशा वाटतात. पुस्तकाची छपाई व मुखपृष्ठादि सजावट 'कलापद'च्या भूमिकेला सुसंगत अशीच आहे.

मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य

प्रकाशक : दे. गो. लांडगे, मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर. पृ. १३४, मूल्य १। रु.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ही सध्याच्या मध्यप्रदेशांतील संशोधन कार्य करणारी अग्रगण्य संस्था आहे. १९३४ ते १९५४ या वीस वर्षांत विविध क्षेत्रांमध्ये या प्रांतांत किती कार्य झालें आहे याचा रोचक व माहितीपूर्ण आढावा अनेक तज्ञ लेखकांनी या पुस्तकांत घेतला आहे. एकंदर नऊ लेखकांचे लेख यांत असल्यामुळे एखाद्या नवरत्न दरबाराचेंच स्वरूप त्यास आलें आहे. अभ्यासकांना या पुस्तकाचा फार उपयोग होण्यासारखा आहे.

—व. कृ. व.

वाग्वीणा

संपादिका : शकुंतला दिवाणजी, अमरावती.

प्रस्तुत मासिक अमरावती येथे मुख्यतः उत्साही स्त्रियांनी चालविलें असून मे १९५६ चा अंक त्यांनी आमच्याकडे अभिप्रायार्थ पाठविला आहे. स्त्रियांना उपयुक्त असे लेख यांत आहेतच, पण अन्य विषयावरहि नऊ लेखकांचे लेख व कविता यांत आलेल्या आहेत. सर्वत्र बुद्धजयंतीचा महोत्सव झाला त्याचा परिणाम याहि मासिकावर झाला हें स्वाभाविक आहे. याहि विषयावरील कविभूषण खापर्डे यांचा लेख आम्हांला विशेष उल्लेखनीय वाटतो. या आमच्या नूतन भावंडास आम्ही सुयश चिंतितों.

श्रीहरी प्राप्तीसाठी भक्तिमार्ग उपदेश

ले. ना. फ. फणफणे, शेगाव (वऱ्हाड). किंमत १२ आणे.

या लहानशा पुस्तकांत संत वचनांच्या आधारे मुमुक्षूंना नेहमीचा अध्यात्मोपदेश केला आहे.

—संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुण्यतिथि

वि. सा. संघातर्फे गडकरी स्मारकगृहांत कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची पुण्यतिथि शनिवार दि. २-६-५६ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां श्री. तात्यासाहेब भोळे यांचे अध्यक्षतेखाली साजरी करण्यांत आली. प्रमुख व्याख्याते प्रा. या. मु. पाठक व अध्यक्ष श्री. तात्यासाहेब भोळे यांचीं कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचे वाङ्मयावर सुश्राव्य भाषणें झालीं.

कै. वीर वामनराव उर्फ दादासाहेब जोशी यांना श्रद्धांजलि

वि. सा. संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, म. प्र. संशोधन मंडळ, अभिनव नाटय मंदिर, राजाराम वाचनालय इत्यादि विविध संस्थांतर्फे वि. सा. संघाच्या गडकरी स्मारकगृहांत शनिवार दि. ९-६-५६ रोजीं वीर वामनराव जोशी यांचे निधनाबद्दल दुखवटयाची सभा घेण्यांत आली.

अध्यक्षस्थानीं कुलगुरु न्यायमूर्ति अण्णासाहेब मंगळमूर्ति होते. सभेंत श्री. बाळासाहेब ढवळे, श्री. पु. य. देशपांडे, श्री. द. रा. गोमकाळे, म. म. वा. वि. मिराशी, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, बॅ. शेषराव वानखेडे, श्री. तात्यासाहेब भोळे व श्री. य. गो. माल्ोदे यांनी विविध संस्थांतर्फे दादांच्या त्यागमय व कर्तृत्ववान जीवनाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या स्मृतीला श्रद्धांजलि अर्पण केली.

कै. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा २५ वा स्मृतिदिन

वि. सा. संघातर्फे दि. १५-६-५६ शुक्रवार रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां कै. अच्युतराव ब. कोल्हटकर यांचा २५ वा स्मृतिदिन संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. कै. अच्युतरावांची धडाडी, त्यांची अनुपम लेखनशैली व त्यागी जीवन यांचा गौरवपर उल्लेख डॉ. ल. वा. परांजपे, श्री. मा. ज. कानेटकर व श्री. बाळासाहेब ढवळे यांनी आपल्या भाषणांतून केला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघातर्फे आयोजित कै. लोकमान्य टिळक व कै. प्रिं. आगरकर जन्म-शताब्दि महोत्सवनिमित्त होणारे मुख्य कार्यक्रम

कै. प्रिं. आगरकर यांच्या तैलचित्राचें अनावरणाचा कार्यक्रम रँ. र. पु. परांजपे, पुणे यांचे हस्तें दि. १९-७-५६ गुरुवार रोजीं होईल.

कै. लोकमान्य टिळक यांच्या तैलचित्राचें अनावरणाचा कार्यक्रम लोकनायक माधव श्रीहरि अणे यांचे हस्तें दि. २९-७-५६ शुक्रवार रोजीं होईल.

या शिवाय श्री. दाजीसाहेब आपटे, बडोदा, श्री. डॉ. शं. दा. पेंडसे इत्यादि नामवंत वक्त्यांचीं व्याख्यानें होतील. नाट्यप्रयोग, राष्ट्रीय प्रदर्शन इ. कार्यक्रम करण्याचाहि विचार आहे.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम

शुक्रवार दि. २२ जून रोजीं सायं. ७ वाजतां भारत सरकारचे सीनिअर सायकॉलॉजिस्ट श्री. नी. र. उर्फ वसंतराव वऱ्हाडपांडे यांचे, प्रा. भा. श्री. वर्णेकर यांचें अध्यक्षतेखाली, विदर्भ साहित्य मंदिरांत "साहित्याचीं मूल्यें" ह्या विषयावर विचारपरिप्लुत भाषण झालें.

* *

डॉ. बाळकृष्ण केसकर, आकाशवाणी व वार्ता खाते मंत्री, भारत सरकार यांची भेट

शनिवार दिनांक २२ जून १९५६ रोजीं सायं. ७ वाजतां भारत सरकारच्या आकाशवाणी व वार्ताखात्याचे मंत्री डॉ. बाकृळष्ण केसकर यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. याप्रसंगीं त्यांनी विदर्भ साहित्य मंदिर आणि रंगमंदिराचें चालू बांधकाम यांचें अवलोकन केलें. त्यानंतर गडकरी स्मारक सभागृहांत पुष्पहार घालून त्यांचें स्वागत करण्यांत आलें. अनौपचारिक चर्चा आणि कॉफीपान झाल्यानंतर हा कार्यक्रम आटोपला.

* *

परिक्षा समिति

उपाधिधारी शालयोजनेचें यश

सुमारें १०० उपाधिधाऱ्यांनी शुल्क पाठवून शाल प्राप्त करून घेण्याचें आवेदन पाठविलें असून त्यांना दि. २२ जुलै ५६ रोजीं संघाचें प्रमाणित उपाधिधारी (रजिस्टर्ड ग्रॅज्युएट) बनविलें जाईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समितीचा नवा उपक्रम

नागपुरांतील शंभर शाळांना भेटी देण्याचा उपक्रम परीक्षा समितीने सुरू केला असून त्यांत बरेंच यश लाभत आहे.

*   *

सभासद

विदर्भ साहित्य संघाचे १ एप्रील पासून आतापर्यंत पुढील नवीन आजीव सभासद झालेले आहेत.

(१) श्री. खं. ना. वाडेगांवकर—नागपूर
(२) श्री. रा. वि. काळीकर ,,
(३) दि. ब. ना. र. चांदोरकर ,,
(४) श्री. वेणीमाधवशास्त्री बा. जोशी ,,

विदर्भ साहित्य संघ, परीक्षा समिति वृत्त

केंद्राधिकाऱ्यांना सूचना—

१ सर्वांनी आपल्या केंद्राचीं आवेदनपत्रें जास्तींत जास्त १९ जुलैच्या आंत कार्यालयाकडे सशुल्क पाठवावींत.

२ सरळ परिचितला वा स्नातकला बसणाऱ्यांकडून १ रुपया अतिरिक्त शुल्क घेऊन विवरणांत तसें नमूद करावें.

३ केंद्राधिकारी पुरस्कार परस्पर कापून न घेतां सारे परीक्षाशुल्क एकत्रितें एकदाच सरचिटणीसांकडे पाठवावें.

४ गतसत्रांत व चालू सभांकरिता ज्यांनी आवेदनपत्रें पाठविलीं नाहीतं अशांना यापलीकडे युगवाणीचा अंक पाठविला जाणार नाही.

*   *

उपाधिधाऱ्यांना सूचना—

१ ज्यांनी शालशुल्क भरलें आहे, असे उपाधिधारी समारंभास उपस्थित राहणार नसल्यास त्यांनी तशी सूचना संचालकांना पूर्वीच दिली पाहिजे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२ समारंभास उपस्थित राहणाऱ्यांनी समारंभ सुरू होण्याच्या १० मिनिटें अगोदर समारंभ-स्थानीं उपस्थित होऊन आपल्या आगमनाची कल्पना संचालकांना द्यावी.

३ **शालवितरण समारंभ** मा. न्यायमूर्ति अण्णासाहेब मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली २२ जुलै रोजीं सकाळीं ८ ला विदर्भ साहित्य मंदिरांत होईल. कांही अपरिहार्य अडचणीस्तव योग्य वेळीं निमंत्रण न पोचल्यास हेंच निमंत्रण मानावें.

४ **उपाधिधारी संमेलन** दि. २२ जुलै रोजीं प्रा. श्री. बाळासाहेब ढवळे संघाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली दुपारीं ३ वाजतां होईल.

* *

प्रचारकांना सूचना—

१ प्रस्तुत सत्रांत सुमारें ५००० परीक्षार्थी परीक्षेला बसविण्याचा संकल्प पुरा करण्याची जबाबदारी प्रचारकांची आहे.

२ पुरस्काराची अपेक्षा असणाऱ्यांनी वि. सा. संघाचे सदस्य होऊन व नवें आवेदनपत्र भरून पुनर्नवीकरण करून घेणें आवश्यक आहे. प्रचारकांना स्वतंत्रपणें आवेदनपत्रें मागविता येतील. परंतु तीं परीक्षार्थ्यांकडून सशुल्क भरवून तीं केंद्राधिकाऱ्यांमार्फतच पाठवावींत आणि आपलें नांव केंद्राधिकाऱ्यांच्या विवरणांत दाखल करून घ्यावें.

(प्रा) **माणिक के. वैतुले**
संचालक, परीक्षा समिति, वि. सा. संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ